www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक ४७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, २५ जून २०२४

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

थोडक्यात

प्रकल्पग्रस्तांची पुन्हा नैनाविरोधी हाक... ; एक जुलैपासून आंदोलन

● पनवेल, भावना जैन :

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र म्हणजे नैना प्रकल्प रद्द करण्यासाठी पुन्हा प्रकल्पग्रस्त एकवटणार आहेत. मागील दोन वर्षांपासून नैना प्रकल्प रद्द करण्यासाठी शेतक-यांनी विविध आंदोलने केली आहेत. १ जुलैपासून बेलापूर येथील नैना टॉवरसमोर शेतकरी प्राणांतिक उपोषण करणार आहेत. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पापासून २५ किलोमीटर क्षेत्रासाठी नियोजनबद्ध बांधकामातून स्मार्ट शहर उभारणीसाठी नैना प्रकल्पाची घोषणा २०१३ साली केली. पान २ वर

राज्यातील दूध उत्पादकांना दर वाढवून द्या अन्यथा शेतकऱ्यांबरोबर रस्त्यावर उतरु: नाना पटोले

● मुंबई, विशाल कारंडे :

महाराष्ट्रातील भाजपा प्रणित सरकार हे शेतकरी विरोधी असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. विविध राज्यात शेतकऱ्याच्या दुधाला ४५ रुपया पर्यंत भाव मिळत आहे परंतु महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दुधाला फक्त २७ रुपये भाव मिळतो आणि हेच दूध अमूल व इतर दूध कंपन्यांकडून ग्राहकाला ५५ ते ६० रुपये प्रति लिटर विकले जात आहे.

राज्य सरकारने तातडीने यात लक्ष घालून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाचे दर वाढवून द्यावेत अन्यथा शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे. गांधी भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, श्वेतक्रांतीमध्ये ज्या दुध उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे योगदान आहे त्यांनाच राज्यातील भाजपा-शिंदे सरकार लुटत आहे. पान २ वर

ठाणे - ठाण्यातील कापूरबावडीच्या सर्व्हिस रोडवरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहन चालकाला कसरत करून या खड्ड्यांतून वाहन काढावी लागतात.

मुंबईतील मराठी टक्का घटतोय, ५० टक्के घरं राखीव ठेवण्याच्या कायद्याची गरज, ठाकरेंच्या आमदाराची मागणी

■ वायव्य मुंबई लोकसभेच्या निकालाविरोधात कोर्टात जाणार: अनिल परब रवींद्र वायकर यांच्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. अमोल कीर्तीकर यांच्यावतीने सुद्धा आम्ही रवींद्र वायकर यांच्याविरोधात या आठवड्यात कोर्टात जाऊ. निवडणूक आयोगाच्या निर्णयाबद्दल कोर्टात जाण्यासाठी 45 दिवस असतात, असे अनिल परब यांनी म्हटले. यावेळी अनिल परब यांनी आगामी विधानपरिषद निवडणुकीसंदर्भातही भाष्य केले. प्रत्येकजण निवडणूक जिंकण्याच्या दृष्टिकोनातून लढत असतो. यासंदर्भात आम्ही महाविकास आघाडीवरून एकत्रित निर्णय घेऊ. निवडणुकीला स्थगिती संदर्भात आम्ही कायदेशीर सल्ला घेत आहोत, असे अनिल परब यांनी म्हटले.

● मुंबई, दिगंबर जाधव :

मुंबईत मराठी माणूस टिकला पाहिजे. त्यासाठी शहरात नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतींमध्ये 50 टक्के घरं मराठी माणसासाठी आरक्षित असावीत, अशी मागणी ठाकरे गटाचे मुंबई पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार अनिल परब यांनी केली. गेल्यावर्षी मी याबाबत एक अशासकीय विधेयक सादर केले होते. मांसाहार आणि धर्माच्या आधारावर घरे नाकारण्याच्या समस्येचे निराकरण करणे हे विधेयकाचे उद्दिष्ट होते. मुंबईत मराठी लोकांची लोकसंख्या कमी होत आहे. त्यामुळे तातडीने कायदा करण्याची गरज अनिल परब यांनी व्यक्त केली. ते सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकारपरिषदेत बोलत होते.

मुंबईत मराठी माणसांसाठी परवडणाऱ्या दरात घर बांधण्याची मागणी राज्य सरकार या अधिवेशनात पूर्ण करेल, अशी अपेक्षा आहे. कारण मराठी माणसाला घरे नाकारण्याच्या अनेक तक्रारी येत आहेत, असे अनिल परब यांनी म्हटले. पान २ वर

शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत राज्य सरकारला जाग येण्यासाठी पोस्टाने पाठवला अलार्म; ठाकरेंच्या महिला शिवसैनिकांची अनोखी शक्कल

● धुळे, सचिन कदम :

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर झालेली बियाण्यांच्या दरातील वाढ आणि वजनात झालेली घट यामुळे शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवासेना कार्यकारणी सदस्य प्रियंका जोशी यांनी जिल्हा प्रशासनासह राज्याचे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे . याबाबतचे पत्र प्रियंका जोशी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पाठवले आहे. या सोबतच या प्रश्नावर राज्य सरकारला जाग यावी, यासाठी पोस्टाद्वारे अलार्म पाठवून प्रियंका जोशी यांनी लक्ष वेधले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ

गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी दुष्काळ, बे मोसमी पाऊस, अशा विविध संकटांनी हैराण झाला आहे. त्यातच सोयाबीन कपाशीचे भाव कमी झाले आहे, अशा विविध समस्यांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत असून यंदा बियाण्याचे भाव वाढले आहे. तर उत्पादनात देखील मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पोस्टाने अलार्म पाठवत वेधले लक्ष

ही समस्या लक्षात घेता शेतकऱ्यांना अनुदान देण्यात यावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवा सेना कार्यकारणी सदस्य प्रियंका जोशी यांनी जिल्हा प्रशासनासह राज्य सरकारकडे केली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवले आहे. तसेच राज्य सरकारला जाग यावी, यासाठी पोस्टाने अलार्म देखील पाठविण्यात आला आहे. प्रियंका जोशी यांनी अनोखे आंदोलन करत राज्य सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

मतदार यादीची माहिती नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी राजकीय पक्षांनी केंद्रस्तरीय प्रतिनिधी नेमावेत - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

● ठाणे, रोहित जैसवाल :

पुढील काळात होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादींचे अद्ययावतीकरण, नवीन मतदार नोंदणीसाठी तसेच प्रारुप व अंतिम मतदार यादीची माहिती नागरिकांपर्यंत पोहचावी, यासाठी सर्व राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नेमावेत. तसेच मतदार यादीत नाव असेल तरच मतदान करता येईल, हा संदेश सर्व नागरिकांपर्यंत पोहचवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने 1.7.2024 या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम (दुसरा) जाहीर केला आहे. त्याची माहिती देण्यासाठी आज ठाणे जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना कदम, तहसीलदार प्रदीप कुडळ यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पान २ वर

पुणे ड्रग्स प्रकरणातील आरोपींना २९ जूनपर्यंत पोलिस कोठडी

● पुणे, अभिजित येरल्लू :

पुणे L3 बार ड्रग्सप्रकरणातील आरोपींना 29 तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. ड्रग्स प्रकरणातील आठ आरोपींना 29 जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सत्र न्यायालयाने सोमवारी झालेल्या सुनावणीत हा निर्णय दिला आहे. पुणे ड्रग्स प्रकरणातील आरोपींना आज कोर्टात हजर करण्यात आलं, त्यानंतर न्यायालयाने ही शिक्षा सुनावली आहे.

आरोपींना सात दिवसांची पोलिस कोठडी

पोलिसांनी आठ आरोपींना न्यायालयाता हजर करताना कोर्टाकडून सात दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. त्यानंतर न्यायालयाने आरोपींना कोठडी सुनावली आहे. L3 मध्ये झालेल्या पार्टीची माहिती समोर आल्यानंतर पुण्याचं ड्रग्स कनेक्शन उघड झालं आहे. L3 मध्ये झालेल्या पार्टीमध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश होता का, याचा तपास सध्या सुरु आहे.

तरुणांच्या रक्ताचे नमुने तपासणीसाठी पाठवले

सोशल मीडियाद्वारे पार्टीचे आयोजन करण्यात आलं होतं. L3 बारचं बिल ऑनलाईन पद्धतीने भरलं गेलं आहे. पान २ वर

सातारा जि .प. अधिकारी यांच्या विरोधातील तक्रारीबाबत तातडीने कारवाईचे विभागीय आयुक्तांना सूचना

● सातारा, नितीन देवळेकर :

सातारा जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)श्रीमती अर्चना वाघमळे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर महेश खलिपे यांनी केलेल्या आर्थिक भ्रष्टाचाराबाबत व आरोग्य विभागातील गैरकारभाराबाबत श्री शशिकांत जाधव यांनी आरोप करून उपोषण केले होते. त्याची गंभीर दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या कक्ष अधिकारी यांनी पुणे विभागीय आयुक्त यांनी तातडीने योग्य ती कारवाई करावी अशी सूचना केल्याचे पत्र दिल्याने खळखळ माजली आहे.

याबाबत माहिती अशी की ,सातारा जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अर्चना वाघमळे यांच्या भ्रष्टाचाराबाबत उपोषण करते श्री शशिकांत शिवाजी जाधव मुक्काम पोस्ट तारळे, जिल्हा सातारा यांनी २४ नोव्हेंबर २३ व एक जून २०२४ व २१ जून २०२४ रोजी लोकशाही मार्गाने लेखी तक्रार केली होती. या तक्रारीमध्ये प्रती ग्रामसेवक पाच हजार रुपये व ग्राम विकास अधिकारी यांच्याकडून सात हजार रुपये दिवाळी व मार्च महिन्यात कलेक्शन गोळा केले. तसेच खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली येथील अपहर व सरकारी सेवा केंद्राचे बनावट खोटे खाते उघडून घोटाळा केला आहे. सदर घोटाळा लपविण्यासाठी लॅपटॉप, मोबाईल जप्त करून पुरावा नष्ट करण्याचे काम केले. असा आरोप करून सामाजिक कार्यकर्ते शशिकांत जाधव हे पंधरा दिवसापासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते .परंतु याची कुठेही वाचत होऊ नये. म्हणून जिल्हा परिषदेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांनी अनेक यंत्रणेशी संपर्क साधला. असाही आरोप श्री सुनील बावधनकर यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

याचबरोबर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर महेश खलिपे यांच्या अनियमित व अनाधिकृत भ्रष्ट कारभाराबाबतही आरोप करण्यात आलेले आहेत. पान २ वर

जालन्यातील गावात झळकला बॅनर, ओबीसी वगळून राजकीय नेत्यांना गावबंदी

● जालना, सचिन कदम :

मराठा आरक्षणाच्या उपोषणाचं केंद्र बनलेल्या जालना जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून सामाजिक वातावरण बिघडल्याचं चित्र दिसून येत आहे. मराठा आरक्षणासाठी उपोषणाच्या माध्यमातून लढा देणाऱ्या मनोज जरांगे यांनी लोकसभा निवडणुकीनंतर पुन्हा उपोषण सुरू केलं, त्यावेळी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावातील ग्रामस्थांनी त्यांच्या उपोषणाला विरोध केला होता. मराठा आरक्षणाच्या उपोषणामुळे आणि मनोज जरांगेंमुळे गावातील जातीय सलोखा बिघडत असल्याचं ग्रामस्थांनी म्हटलं होतं. मात्र, जरांगे यांनी त्याच गावात मंडप टाकून उपोषण केलं. त्यानंतर, जरांगेंच्या मागणीला विरोध करत ओबीसी समाजाच्या आरक्षण हक्कासाठी लक्ष्मण हाके यांनी जालना जिल्ह्यातूनच उपोषण सुरू केले. त्यांच्या उपोषणालाही राज्यभरातून ओबीसी समाजाने पाठिंबा दिल्याचं पाहायला मिळालं. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले पाहिजे, सरसकट सगेसोयरे आरक्षणाची मागणी मान्य झाली पाहिजे, या मागण्यांसह मनोज जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे. पान २ वर

मनोज जरांगेंच्या जुन्या सहकाऱ्याला काळं फासलं

आधी शाल घालून सत्कार, पुन्हा दिला इशारा

● छ. संभाजीनगर , नितीन देवळेकर :

मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून राजकीय नेत्यांसह काहीजण थेट भूमिका घेऊन जरांगे यांच्या आरक्षणाच्या मागणीला विरोधही करत आहेत. राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जरांगे म्हणजे मराठा समाज नाही, असे म्हटले होते. त्यानंतर, स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड संघटनेने आक्रमक भूमिका घेत विखे पाटील यांना महाराष्ट्रात फिरू देणार नसल्याचे म्हटले. त्यानंतर, दुसरीकडे कधीकाळी मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी असलेल्या मराठा आंदोलनातील डॉ. रमेश तारक यांच्या तोंडाला काळं फासण्यात आल्याची घटना घडली आहे. तारक यांना काळे फासतानाचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे. मात्र, या घटनांमुळे सामाजिक सलोखा बिघडत असल्याचं दिसून येत आहे.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिले पाहिजे, सरसकट सगेसोयरे आरक्षणाची मागणी मान्य झाली पाहिजे, या मागण्यांसह मनोज जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे. जरांगे यांच्या मागणीवर सरकारने 1 महिन्याचा अवधी मागितला असून कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे मराठा समाजाला कुठल्याही परिस्थितीत ओबीसीतून आरक्षण देऊ नका, अशी मागणी करत लक्ष्मण हाके यांनी उपोषण सुरू केले होते. आता, दोन्ही नेत्यांनी उपोषण मागे घेतलं आहे. पण, या उपोषणाची झळ सामाजिक सलोखा बिघडवण्यात बसत असल्याचं दिसून येत आहे. कारण, जरांगे यांच्या उपोषणास विरोध केल्यामुळे त्यांच्याच जुन्या सहकाऱ्याला काळं फासण्यात आलं आहे.

मनोज जरांगे यांच्या उपोषणाला विरोध करणारे पत्र मी 2 महिन्यांपूर्वी दिले होते, 2 महिन्यांनी ही घटना घडली आहे. आज सकाळी पेशंट म्हणून हे लोक माझ्याकडे आले. तसेच, वाढदिवस म्हणून सत्कार करतो म्हटले, पण त्यांना माझा वाढदिवस आज नाही, असे सांगितल्यानंतरही त्यांनी माझा सत्कार केला.

त्यानंतर, चेहऱ्याला काळ फासलं आहे, यामागे कोण आहे, याची चौकशी व्हावी, अशी मागणी डॉ. तारक यांनी केली आहे. पान २ वर

संपादकीय

एवढा विलंब का लागला ?

मणिपूरमधील हिंसक वांशिक संघर्षाला वर्ष उलटल्यावर केंद्रीय गृहमंत्रीपदाची पुन्हा सूत्रे हाती घेतलेल्या अमित शहा यांनी मैतेई आणि कुकी या दोन्ही समजांच्या प्रतिनिधींबरोबर एकत्रित बैठक घेण्याचे जाहीर केले. वांशिक संघर्ष आटोक्यात आणण्याकरिता परस्परांविषयी कमालीची अविश्वासाची भावना निर्माण झालेल्या उभय समाजांच्या नेत्यांना एकत्र बसवून मार्ग काढणे हे आधीच अपेक्षित होते. पण हा संघर्ष पेटल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तब्बल दोन महिन्यांनंतर मतप्रदर्शन केले. केंद्रीय गृहमंत्र्यांनी या राज्यास यापूर्वी दोनदा भेट देऊनही हिंसाचार थांबला नाही. यावरून सत्ताधारी किती गंभीर होते हे लक्षात येते. जम्मू आणि काश्मीरला घटनेच्या ३७०व्या कलमानुसार असलेले विशेषाधिकार रद्द करून या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था सुधारल्याबद्दल केंद्र सरकार स्वतःची पाठ थोपटून घेत असले तरी त्याच वेळी मणिपूरमधील हिंसाचार आटोक्यात आणण्यात केंद्रातील भाजप सरकारला अद्याप शक्य झालेले नाही. मणिपूरमध्ये सुमारे ५३ टक्के लोकसंख्या असलेल्या मैतेई समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर गेल्या वर्षी मार्चपासून येथे उसळलेल्या वांशिक संघर्षाने आजवर २५० पेक्षा अधिक जणांचा बळी गेला तर हजारो लोक विस्थापित झाले. या संघर्षात कुकी समाजाच्या महिलांची नग्न अवस्थेत धिंड काढण्यात आल्याची चित्रफीत प्रसारित झाल्याने देशभर संतापाची लाट उसळली होती. बहुसंख्य मैतेई हे हिंदू तर कुकी-झोमी - नागा हे आदिवासी बहुसंख्येने ख्रिश्चन

आहेत, हे सरकारी यंत्रणाही आवर्जून सांगत राहिल्या. केंद्र सरकार व मणिपूरमधील भाजप सरकारने मैतेईंना चुचकारण्यावर भर दिला. हा संघर्ष इतका टोकाला गेली की, आजही मैतेई कुर्कीचे वास्तव्य असलेल्या डोंगराळ प्रदेशात जाऊ शकत नाहीत वा कुकी राजधानी इम्फाळमध्ये फिरू शकत नाहीत. मणिपूरमध्ये कायदा आणि सुव्यव्यस्था बिघडल्याने आता लूटमार आणि अपहरणाचे प्रकार वाढले आहेत. लोकसभा निवडणुकीत मणिपूरमध्ये भाजपला मोठा फटका बसला व एकही जागा राखता आली नाही. दोन्ही जागा काँग्रेस पक्षाने जिंकल्या. यापाठोपाठ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मणिपूरवरून केंद्र सरकारचे कान उपटले. 'मणिपूर अजूनही धगधगत आहे. प्राधान्याने हा प्रश्न सोडविणे ही सरकारची जबाबदारी आहे', असे मत भागवत यांनी व्यक्त केले होते. लोकसभेतील पराभव किंवा भागवतांनी सरकारला दिलेला घरचा अहेर यातूनही कदाचित केंद्रीय गृहमंत्र्यांनी पुन्हा मणिपूरवारी केली असावी. मणिपूरमधील हिंसक संघर्ष आटोक्यात आणण्यात पूर्णपणे अपयशी ठरलेले मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांची वास्तविक भाजपच्या नेत्यांनी उचलबांगडी करणे अपेक्षित होते आणि आहे. मुख्यमंत्र्यांवर आमचा अजिबात विश्वास नाही आणि ते पदावर असेपर्यंत चर्चेसाठी येणार नाहीत, अशी ठाम भूमिका कुकी समुदायाने यापूर्वीच घेतलेली आहे. मैतेई समाजाची नाराजी नको म्हणून भाजपच्या नेतृत्वाने मुख्यमंत्र्यांना पाठीशी घातले. पण आता मुख्यमंत्री बिरेन सिंह भाजप नेतृत्वाच्या

बहुधा मनातून उतरलेले दिसतात. कारण गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्लीत मणिपूरच्या संघर्षावर आढावा घेण्यासाठी आयोजित केलेल्या बैठकीला मुख्यमंत्र्यांना निमंत्रणच नव्हते. यावर ही फक्त अधिकाऱ्यांची बैठक होती, असे स्पष्टीकरण देण्यात आले असले तरी एवढ्या महत्त्वाच्या बैठकीला स्वपक्षीय मुख्यमंत्र्यांना बोलाविण्याचे टाळले जाते हा संदेश महत्त्वाचा आहे. अमित शहा यांनी मैतेई आणि कुकी समाजाच्या प्रतिनिधींना एकत्र बसवून मार्ग काढण्याचा केलेला निर्धार स्त्युत्यच आहे. पण त्यासाठी दोन्ही समाजांना विश्वासात घ्यावे लागेल. कुकी समाजाने मुख्यमंत्र्यांशी चर्चाच होऊ शकत नाही, असा ठाम पवित्रा यापूर्वीच घेतला आहे. कुकी समाजाला असलेल्या अनुसूचित जमातीच्या दर्जाचा फेरविचार करण्याची भूमिका मध्यंतरी मुख्यमंत्री सिंह यांनी घेऊन आगीत तेल ओतण्याचे उद्योग केले होते. केंद्रीय सुरक्षा दले बघ्याची भूमिका घेतात असा जाहीर आरोपही त्यांनी केला होता. यामुळेच बहुधा अमित शहा यांनी मुख्यमंत्र्यांना बैठकीपासून दूर ठेवले असावे. असल्या मुख्यमंत्र्यांना पदावर कायम ठेवायचे की नाही यावर भाजप नेतृत्वाला निर्णय घ्यावा लागणार आहे. ईशान्येकडील सीमावर्ती भागातील एक राज्य कायम धगधगत राहणे हे केव्हाही सुरक्षेच्या दृष्टीने चिंताजनकच आहे. वर्षभराने का असो, दोन्ही समाजांना एकत्र आणण्याची गृहमंत्र्यांची योजना ही द्वेषाचे राजकारण थांबवण्याचीही नांदी ठरावी, अशी अपेक्षा सर्वच शांतताप्रेमींना असेल.

आजची चित्रोळी

ढगांच आईस्क्रिम
कोनात भरलं !
खाऊन किती खाणार ?
नाहींच सरलं !!

मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई

पान १ वरून...

प्रकल्पग्रस्तांची पुन्हा नैनाविरोधी हाक ; एक...

या प्रकल्पामध्ये संपादित जमिनीचा ४० टक्के विकसित भूखंड शेतकऱ्यांना दिला जाणार आहे.

हा सर्वात चांगला मोबदला असल्याचे सिडको अधिकाऱ्यांचा दावा आहे. परंतू नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपयांचे पॅकेज दिल्याने नैनाबाधित शेतकऱ्यांनी सुद्धा जमीनीच्या संपादनापोटी सिडकोने व राज्य सरकारने चांगले पॅकेज द्यावे किंवा युडीसीपीआर कायद्यानूसार नैना क्षेत्रातील शेतकऱ्यांना नूकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

शेतजमीनीसमोरील रस्ते व पायाभूत सुविधा राज्य सरकारने स्वखर्चातून उभारुन विकसित भूखंड शेतकऱ्यांना द्यावा अशी मागणी तरुण शेतकऱ्यांकडून होत आहे. नैना प्रकल्प जाहीर करताना शेतकऱ्यांना विश्वासात न घेता तसेच शेतजमिनीचे भूसंपादन न करता थेट शेतकऱ्यांच्या जमिनीवर नैनाचा प्रारुप विकास आराखडा जाहीर केल्यामुळे विमानतळ प्रकल्पाशेजारी शेतजमीनी असूनही शेतकऱ्यांच्या जमिनीचा दर कोसळल्याने शेतकऱ्यांना कवडीमोल भावाने जमिनी विकाव्या लागल्या. शेतकऱ्यांची सुशिक्षित पीढी सिडकोच्या कारभाराविरोधात एकवटली असून त्यांनी गावठाण विस्तार हक्क समिती स्थापन केली आहे. मागील दोन वर्षापासून नैना प्रकल्प रद्द करण्यासाठी सिडको विरोधात या समितीसह शेकाप व महाविकास आघाडीतील राजकीय पक्ष तसेच प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक संघटना आंदोलन करत आहे. सध्या याच समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी पुन्हा आक्रमक पवित्रा घेत १ जुलैपासून बेलापूर येथील सिडको मंडळाच्या नैना टॉवर क्रमांक १० समोर प्राणांतिक उपोषण करणार असल्याचे समितीचे अध्यक्ष अनिल ढवळे यांनी सांगीतले.

राज्यातील दूध उत्पादकांना दर वाढवून द्या...

गाई, म्हशींचे खाद्य व त्यांच्यावर होणाऱ्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे, त्याप्रमाणात दूध खरेदी दर मात्र कमी आहेत. हे दर वाढवून देऊन शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवावी असे नाना पटोले म्हणाले.

काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत तेलंगणातील काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांचे सरसकट २ लाख रुपयांचे कर्ज माफ केले आहे. २७ जूनपासून राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होत असून भाजपा शिंदे सरकारनेही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची घोषणा या अधिवेशनात करावी, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

पेपरफुटीचे धागेदोरे महाराष्ट्रात..

नीट परिक्षेच्या पेपरफुटीचे कनेक्शन महाराष्ट्रापर्यंत पोहचले आहे. ज्या ज्या राज्यात भाजपाचे सरकार आहे त्या त्या राज्यात नीट पेपर फुटीचे कनेक्शन सापडले आहेत. केंद्रातील सरकार विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळत आहे. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करून नीट परीक्षाच रद्द करा अशी काँग्रेसने मागणी केली होती आता सीबीआय चौकशी सुरु झाली आहे पण परीक्षा रद्द केलेली नाही, असेही नाना पटोले म्हणाले.

मुंबईतील मराठी टक्का घटतोय, ५० टक्के घरं...

शिक्षक आणि पदवीधर निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्री शिंदे यांनी आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोपही अनिल परब यांनी केला. आचार संहिता सुरु असताना धोरणात्मक चर्चा होत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परवा जी बैठक घेतली त्यामध्ये काही अधिकारी आणि शिक्षण संचालक होते. त्यांना काही आश्वासनं देण्यात आली. याची माहिती आम्ही घेतली आहे. हे आचारसंहितेचं उल्लंघन असल्याचे अनिल परब यांनी म्हटले. तसेच मुंबई पदवीधर मतदारसंघातील अनेक मतदारांची नावं गहाळ झाल्याबद्दल निवडणूक आयोगाकडे दाद मागितल्याचे परब यांनी सांगितले. यावर निवडणूक आयोगाने उत्तर दिलंय की, कोणत्याही मतदारांची नावं गहाळ झालेली नाहीत, ती मतदार यादीमध्येच आहेत.

नाशिकमध्ये शिक्षकांना पैसे वाटप केले गेले, याबद्दल सुषमा अंधारे यांनी व्हिडिओ फोटो समोर आणले आहेत. याबद्दल आम्ही आज तक्रार दाखल करणार आहोत. मुंबई पदवीधर मतदारसंघात कधीच आतापर्यंत पैसे वाटप करण्यात आले नाही. पण इथे सुद्धा पैसे वाटप केले तर असल्याच्या बातम्या समोर येत आहेत, असेही परब यांनी म्हटले.

मतदार यादीची माहिती नागरिकांपर्यंत...

श्री. शिनगारे यांनी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती देऊन म्हणाले की, मतदारांपर्यंत मतदार यादीची माहिती पोहचविण्यासाठी राजकीय पक्षाची मोठी मदत होणार आहे. निवडणूक प्रशासनाकडून केंद्रस्तरीय मतदान अधिकारी (बीएलओ) नेमण्यात आले आहेत. येत्या 25 जुलै 2024 रोजी एकत्रित प्रारुप यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यावेळी बीएलओंबरोबर राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी समन्वय साधून नवीन मतदार नोंदणी करणे, मतदारांचे नाव यादीत आहे का तपासणे, यादी नाव नसेल अथवा त्यामध्ये दुरुस्ती असेल तर त्यासाठी मतदारांकडून अर्ज भरून घेणे ही कामे करावीत. तसेच गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये नवीन मतदान केंद्रे उभारणे व सध्याच्या मतदान केंद्रांचे सुसूत्रिकरणासाठीही राजकीय पक्षांनी सहकार्य करावे.

मतदार यादींचे अद्ययावतीकरण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे मतदान यादीत नाव असेल तरच नागरिकांना मतदान करता येणार आहे. निवडणूक ओळखपत्र असेल आणि यादीत नाव नसेल तर मतदान करता येणार नाही. त्यामुळे नागरिकांनी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध होताच त्यामध्ये आपले नाव आहे की नाही याची सहनिशा करावी. नाव नसेल तर किंवा त्यामध्ये दुरुस्ती असेल तर तातडीने अर्ज करून नाव नोंदणी/दुरुस्ती करावी, यासाठी राजकीय पक्षांनी मतदारांमध्ये जनजागृती करावी, असे आवाहनही श्री. शिनगारे यांनी यावेळी केले.

पुणे ड्रग्स प्रकरणातील आरोपींना २९ जूनपर्यंत...

अंमली पदार्थ सेवन केलेल्या तरुणांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले आहेत.

सीसीटीव्हीमध्ये दिसणाऱ्या तरुणांना सुद्धा याच आरोपींना त्या बारमध्ये बोलावले होतं. यातील दोन आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमीवर असल्याची माहिती पोलिसांनी कोर्टाला दिली. याप्रकरणी सचिन कामठे या तरुणाचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

L3 बार पार्टी प्रकरणी आठ जणांना अटक

पुणे L3 बार पार्टी प्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली आहे. या आठ जणांना आज पोलीस कोर्टात करण्यात आलं. आरोपींनी पुणे सत्र न्यायालयात हजर केलं गेलं. पुण्यातील एफसी रोडवर असलेल्या L3 बारमध्ये ड्रग्स पार्टी झाल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी संतोष कामठे, सचिन कामठे, उत्कर्ष देशमाने, योगेंद्र गिरासे, रवी माहेश्वरी, अक्षय कामठे, रोहन गायकवाड, दिनेश मानकर यांना कोर्टात हजर करण्यात आलं.

ड्रग्स पार्टीतील व्हिडीओ व्हायरल

पुण्यातील L3 बारमधील आणखी दोन व्हिडीओ समोर आले आहेत. ड्रग्स पार्टीचे आणखी काही व्हिडिओ समोर आले आहेत. रविवारी पहाटे 4 वाजेपर्यंत पार्टी सुरु होती. 40 ते 50 जणांची पुण्यातील एफसी रोड असलेल्या L3 बार मधील पार्टीचे व्हिडीओ समोर आले. हातात मद्याचे ग्लास, डीजेचा मोठा दणदणाट तरुणाईकडून सुरू असल्याचे बारमधील व्हिडीओ सापडले आहेत.

सातारा जि .प. अधिकारी यांच्या विरोधातील...

सातारा जिल्ह्यामध्ये या सर्व प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करावी. अशी मागणी निवेदनाद्वारे केली होती. पण, त्याची गंभीर दखल न घेतल्यामुळे साताऱ्यात पत्रकार परिषद आयोजित केली परंतु त्यालाही प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे या भ्रष्ट कारभाराबाबत यंत्रणा पोखरल्याचाही गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

उपोषणकर्ते श्री शशिकांत जाधव यांची सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण स्थळी भेट घेऊन त्यांना सामाजिक कार्यकर्ते सुनील बावधनकर, रवींद्र शिंगण , यशवंत दनाने, सुरज रोमन, ओमकार परशुराम शिर्के यांच्यासह अनेकांनी पाठिंबा दिला. सदर प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्यामुळे मुख्यमंत्री ते जिल्हाधिकारी यांच्यापर्यंत भारतीय संविधान अनुच्छेद १९(१) नुसार निवेदन दिलेले आहेत. दोन्ही भ्रष्ट अधिकाऱ्यांवर चौकशी करून गुन्हा दाखल करावा .पुरावा नष्ट केल्याबद्दल त्यांची चौकशी करावी .यासाठी आता या प्रश्नाची व्याप्ती वाढवण्यात आलेली आहे. सातारा जिल्हा परिषदेच्या कथित भ्रष्टाचाराबाबत बाबत अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जनजागृती आंदोलन न्यास व माहिती अधिकारी महासंघ महाराष्ट्र राज्य फेडरेशनचे श्री शशिकांत जाधव हेच उपोषणाला बसल्यामुळे या सर्व प्रकरणाची निपक्षपातीपणाने चौकशी व्हावी. वस्तुनिष्ठ सत्य सामोर यावे. अशी मागणी साताऱ्यातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेले आहे. या वेळेला सामाजिक कार्यकर्ते रमेश अनिल उबाळे व अडवोकेट दिलीप जगताप यांनीही त्यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. दरम्यान ,याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता काही अपरिहार्य कारणामुळे संपर्क होऊ शकला नाही. त्यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांची ही बाजू भक्कमपणे मांडण्यात येणार आहे.

जालन्यातील गावात झळकला बॅनर, ओबीसी...

जरांगे यांच्या मागणीवर सरकारने 1 महिन्याचा अवधी मागितला असून कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे मराठा समाजाला कुठल्याही परिस्थितीत ओबीसीतून आरक्षण देऊ नका, अशी मागणी करत लक्ष्मण हाके यांनी उपोषण सुरू केले होते. अखेर, सरकारसोबत हाकेंच्या शिष्टमंडळाची व ओबीसी नेत्यांची बैठक झाल्यानंतर हाके यांनीही आपलं उपोषण मागे घेतलं आहे. मात्र, या दोन्ही नेत्यांच्या उपोषणाचा परिणाम राज्यातील सामाजिक सलोख्यावर होत असल्याचे दिसून येत आहे. गावागावात मराठा आणि ओबीसी असा सुप्त संघर्ष पाहायला मिळत आहे. दोन्हीही नेते मराठा आणि ओबीसी हे भाऊ-भाऊ असल्याचं सांगतात. मात्र, गावपातळीवर याची धग पोहोचल्याचं दिसून येत आहे.

लक्ष्मण हाकेंच्या आंदोलनानंतर जालना जिल्ह्यातील रायगव्हाण गावात राजकीय नेत्यांना गावबंदी करण्यात आली आहे. ओबीसी नेता सोडता अन्य नेत्यांना गावात प्रवेश बंदी करण्यात आली आहे. ओबीसी समाजाने रायगव्हाण गावात या आशयाचा फलक लावला आहे. त्यामुळे, आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आता सामाजिक वातावरण बिघडत चालल्याचं दिसून येत आहे. जालना जिल्ह्याच्या परतूर तालुक्यातील रायगव्हाण गावात राजकीय नेत्यांना गावबंदीचा फलक लावण्यात आला आहे. ओबीसी नेता सोडता अन्य कोणत्याही नेत्यांनी गावात प्रवेश करू नये, तसे झाल्यास मोठा अवमान करण्यात येईल, असा इशाराही या फलकाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. या फलकाचा व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला असून दोन समाजात तेढ निर्माण करणारा हा बॅनर असल्याची चर्चाही रंगली आहे. त्यामुळे, पोलीस प्रशासनाकडून हा बॅनर हटवला जाऊन कारवाई केली जाईल का, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

गावकऱ्यांचा निर्णय अयोग्य - हाके

विशेष म्हणजे या बॅनरवर उपोषणकर्ते लक्ष्मण हाके यांच्यासह ओबीसी नेत्यांच्या फोटो लावण्यात आला आहे. दरम्यान ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी गावकऱ्यांचा हा निर्णय अयोग्य असल्याचं म्हटलं आहे.

मनोज जरांगेंच्या जुन्या सहकाऱ्याला काळं...

जिल्हाधिकारी यांना दिले होते निवेदन

मनोज जरांगे यांचे कधीकाळचे सहकारी डॉ. रमेश तारक यांना मराठा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी काळे फासले आहे. अंतरवाली सराटमध्ये मनोज जरांगे यांच्या उपोषणाला विरोध केल्याने हे काळं फासण्यात आल्याचा आरोप तारक यांनी केला आहे. विशेष म्हणजे डॉ. तारक यांनी जरांगेंच्या उपोषणाला आंतरवाली परवानगी देऊ नये, असे पत्र जिल्हाधिकारी यांना लिहले होते. तसेच, ग्रामस्थांच्या सह्या घेऊन या मागणीचे निवेदनही जालन्याच्या जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही मनोज जरांगे यांनी जालन्यातील अंतरवाली सराटी गावातच आपलं उपोषण केलं. आता, त्याच विरोधाचा राग धरुन, झुंजार छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रमेश तारक यांच्या चेहऱ्यावर काळी शाई ओतून चेहऱ्याला काळं फासलं.

दरम्यान, आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यातील वातावरण गढूळ बनत असून दोन्ही समाजातील वरिष्ठ आणि ज्येष्ठ नेत्यांनी एकत्रित येऊन सामाजिक सलोखा राखण्याचं आवाहन करणे आवश्यक असल्याची अपेक्षा काही जाणकरांकडून करण्यात येत आहे

पदवीधर/शिक्षक मतदारसंघाच्या मतदानाकरिता मतदारांना पर्यायी कागदपत्रे ग्राह्य

नवी मुंबई, :- कोकण विभाग पदवीधर मतदार संघाची निवडणूक दि. 26 जून, 2024 रोजी होणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदारकर्त्यांनी त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करु शकत नाही अशा मतदारांनी त्यांची ओळख पटवून देण्यासाठी निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही ओळखपत्र मतदान केंद्रावर सादर करता येईल. अशी माहिती उपआयुक्त (सा.प्र.)कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे. विधानपरिषदेची द्विवार्षिक शिक्षक मतदारसंघाची निवडणूकीकरिता मतदान करतांना मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटविण्यासाठी जे मतदार ओळखपत्र (EPIC) सादर करु शकत नाहीत, अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र (EPIC) व्यतिरिक्त खालील नमूद पर्यायी कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याबाबत आयोगाने आदेश दिले आहेत. आधारकार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), राज्य/केंद्र सरकारद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र उपक्रम, स्थानिक संस्था किंवा इतर खाजगी औद्योगिक घरे, खासदार/आमदार/एमएलसी यांना अधिकृत ओळखपत्रे जारी केली जातात.

आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्व कळले

आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ४९ वर्ष पूर्ण झाली. बरोबर ४९ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ४९ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

अजित पवारांच्या 'राष्ट्रवादी'ला बालेकिल्ल्यात खिंडार?

पिंपरी : लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडमधील माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. शहरातील १५ ते २० माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे लवकरच अजित पवार गटाला मोठी गळती लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

पिंपरी-चिंचवड अजित पवारांचा बालेकिल्ला होता. सलग १५ वर्षे तेच शहराचे 'दादा' होते. परंतु, २०१७ मध्ये राष्ट्रवादीतून भाजपत गेलेल्या दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, महेश लांडगे यांनी अजितदादांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला. महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता आणली. मात्र, जुलै २०२३ मध्ये पवारच शिवसेना-भाजप सरकारमध्ये सहभागी झाले आणि राष्ट्रवादीचे दोन गट पडले. पक्षातील फुटीनंतर शहरातील संघटना, आमदार, सर्व माजी नगरसेवक अजित पवारांसोबत कायम राहिले. केवळ दोन माजी नगरसेवक शरद पवार यांच्याबरोबर राहिले. पक्षातील फुटीनंतर दोन्ही गटांनी बालेकिल्ला पुन्हा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. शहरात लक्ष घातले. परंतु, लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय वारे बदलले. महाविकास आघाडीच्या बाजूने जनमत असल्याचे दिसल्याने अजितदादांच्या राष्ट्रवादीतील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांमध्ये चलबिचल सुरू झाली. अजित पवार गटाचे प्रवक्ते, माजी नगरसेवक विनायक रणसुभे, भाजपच्या माजी नगरसेविका प्रियंका बारणे यांनी नुकताच पवार गटात प्रवेश केला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील नेते, पदाधिकारी शरद पवार यांची भेट घेऊन चर्चा करत आहेत. गेल्या दोन दिवसांत चिंचवड, भोसरीतील १५ ते २० माजी नगरसेवकांनी शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

ज्येष्ठ कथाकार भिकू बारस्कर लिखित "ध्येयपूर्ती" पुस्तकाचे प्रकाशन

● कल्याण : अग्निशमन जवान अग्नीला सामोरे जातात ते काही कोणत्याही सन्मान किंवा पुरस्काराच्या अपेक्षेने कार्य करीत नाहीत. परमेश्वर संकटात उभा राहतो. तर जवान परमेश्वराच्या रुपात आपला आगीपासून बचाव करतात. या जवानांमुळेच आपली राख होण्याची वाचली आहे. मुक्ततेचा प्रवास एका धाग्यात गुंफलेला असतो असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक दीपक करंजीकर यांनी सार्वजनिक वाचनालय कल्याणचे सरचिटणीस ज्येष्ठ कथाकार भिकू बारस्कर लिखित सेवानिवृत्त मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप गुंड यांची "ध्येयपूर्ती" संघर्षमय जीवनगाथा (दुसरी आवृत्ती) प्रकाशन सोहळ्याच्या वेळी केले.

प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष वेगवेगळ्या माध्यमातून येत असतो.

तुरुंगातील कैद्याच्याही मागे त्यांचा अकल्पित भूतकाळ दडलेला असतो. परंतु माणसाने ध्येयवादी असावं. ध्येयासाठी झगडणाऱ्या माणसाचं प्रेरणादायी दर्शन 'ध्येयपूर्ती' या पुस्तकातून घडते. समाजप्रती कर्तव्य बजावताना सेवाभाव व सहकार्याची भावना प्रत्येक गणवेशाच्या मागे दडलेली असते असे मत जिल्हा कारागृह अधिकारी, आधारवाडी कल्याणचे अधीक्षक आर.आर. भोसले यांनी मांडले. प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ठाणे जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनीही कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

■ कथाकार भिकू बारस्कर यांनी अग्निशमन विभागातील विविध किस्से अनुभव कथन केले. ध्येयपूर्ती पुस्तकाच्या माध्यमातून जीवघेणा संघर्ष, सामाजिक बांधिलकी, मैत्री, सुरक्षितता अशा विविध भावनांचे दाखले दिले. प्रत्यक्षात स्वतः या क्षेत्रात कार्य केल्यामुळे प्रसंगांना वास्तवतेची स्पर्श त्यांच्या मनोगतातून व्यक्त केला. रंगकर्मी शिवाजी शिंदे यांनी "ध्येयपूर्ती" संघर्षमय जीवन गाथा या पुस्तकावर आधारित पोवाडा सादर केला.

■ कार्यक्रम प्रसंगी सार्वजनिक वाचनालय कल्याणचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, विश्वस्त सुरेश पटवर्धन, प्रशांत मुल्हेरकर, माधव डोळे, कार्यकारिणी सदस्य अरविंद शिंपी,साहित्यिक किरण येले, ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ अध्यक्ष चांगदेव काळे, ज्येष्ठ साहित्यिक जनार्दन ओक, रंगकर्मी सुधीर चित्ते, गजानन कराळे, सुधाकर वसईकर, प्रसिद्ध दिग्दर्शक मंगेश सातपुते, वाचकवर्ग व ग्रंथसेविका उपस्थित होते.

■ अग्नी व अग्निशमन दल यांचा घनिष्ट संबंध असल्याने प्रत्यक्षात अग्निदेवतेच्या रुपात अत्यंत नाविन्यपूर्ण व दिमाखदार पद्धतीने ध्येयपूर्ती पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सार्वजनिक वाचनालय कल्याणच्या सभागृहात संपन्न झाला. अग्निदेवतेची प्रतिमा वैष्णवी कल्याणकर हीने साकार केली. वाचनालयाचे चिटणीस माधव डोळे यांनी काव्यात्मक शैलीत कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांची ठाणे जिल्ह्यातील हातभट्टी दारू निर्मिती केंद्रांवर धाड

● ठाणे : राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हातभट्टी दारुचे समुळ उच्चाटन करण्यासाठी २२ जून रोजी राबविलेल्या धाडसत्र मोहिमेमध्ये स्वतः सहभाग घेतला. त्यांनी आपल्या नियंत्रणाखाली पथके तयार करुन ठाणे जिल्ह्यातील मौजे अलिमघर, दिवा, घेसर, खरडर्डी, छोटी देसाई, मोठी देसाई, मानेरे गांव, कालवार, भिवंडी, कोरावळे, शहापुर, कुंभारली व रायगड जिल्हयामधील काही गांवामधील हातभट्टी दारू निर्मीती केंद्रांवर धाडी टाकून उद्ध्वस्त केली. या कारवाईमध्ये १ वारस व २३ बेवारस असे एकुण २४ गुन्हे नोंदविले आहे.

यामध्ये ५९५ लिटर हातभट्टी दारु, ६९ हजार २०० लिटर रसायन व इतर भट्टी साहित्य असा एकुण २६ लाख ७२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. सदर मोहिमेमध्ये उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. सुर्यवंशी यांनी कोकण विभागाचे उप आयुक्त व ठाणे जिल्ह्याचे अधिक्षक यांच्या समवेत स्वतः तीन बोटी मधून मौजे अलिमघर, दिवा, अंजुर खाडीतील हातभट्टी दारू निर्मीती ठिकाणे उध्वस्त केली. तसेच रायगड जिल्हयातील पथकानेसुध्दा एकूण ८ गुन्हे नोंदवून एकुण ४ लाख ६७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. सदर कारवाई मध्ये १३० अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.

मुंबईत संपूर्ण आठवडा मुसळधार पावसाचा अंदाज

● मुंबई : मुंबई तसेच राज्यातील काही भागात पुढील पाच दिवस पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबई आणि उपनगरांत मागील दोन तीन दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू झाली आहे. मात्र, जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. पश्चिमेकडील वाऱ्यांचा वेग वाढल्याने हा संपूर्ण आठवडा मुंबई तसेच राज्यातील काही भागात पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या दरम्यान मुंबईत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहतील.

हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात रविवारी सायंकाळी ७:३० वाजेपर्यंत २३ मिमी तर सांताक्रूझ केंद्रात १५ मिमी पावसाची नोंद झाली. ठाणे परिसरात १३ मिमी पावसाची नोंद झाली. मंगळवार आणि बुधवार ठाण्यात मुसळधार (६४.५ मिमी ते ११५.५मिमी) ते अतिमुसळधार (११५.६ मिमी ते २०४.४ मिमी) पाऊस पडण्याची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यात आजपासून मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यंदा लवकर दाखल झालेल्या मोसमी पावसाने काही दिवस विश्रांती घेतली होती. परिणामी मुंबईकरांना उकाड्याचा सामना करावा लागत आहे. दिवसभर ढगाळ वातावरण असूनही पाऊस पडत नसल्याने आर्द्रतेमुळे उकाड्यात वाढ झाली आहे.

एलएलबी केवळ करिअर नव्हे तर न्याय, निष्पक्षता आणि समानतेचे पालन करणे होय : प्रा. सकृत देव !

● मुरबाड - कोणत्याही क्षेत्रात कायदेशीर अडचणींना तोंड द्यावे लागले, की सर्वांना गरज पडते ती वकिलांची ! खासगी असू दे किंवा सार्वजनिक क्षेत्र; प्रत्येक क्षेत्रात केव्हा ना केव्हा वकिलांची आवश्यकता भासत असतेच. फक्त कंपन्या किंवा सरकारी कार्यालयेच नाही तर वैयक्तिक पातळीवरही कायदेशीर अडचणी सोडवण्यासाठी याच वकील मंडळींची मदत घ्यावी लागते. म्हणूनच आज करिअरच्या अनेक संधी निर्माण झालेल्या पाहायला मिळतात. एलएलबी केवळ करिअर नव्हे तर न्याय, निष्पक्षता आणि समानतेचे पालन करणे होय त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन

एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ 'स्कुल ऑफ लॉ'चे सहाय्यक प्राध्यापक सुकृत देव यांनी केले. ते विद्यापीठाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रा. देव पुढे बोलताना म्हणाले की, एमआयटी एडीटी विद्यापीठ हे प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या दूरदृष्टीने साकारलेले व विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच भविष्यातील नोकऱ्यांची संधी ओळखून कौशल्यावर आधारित शिक्षण देणारे विद्यापीठ आहे. आमचे हजारों विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये अतिशय चांगल्या प्रकारे काम करत आहेत.

१२५ एकरमध्ये पसरलेला विद्यापीठाचा कॅम्पस जागतिक पातळीवरील विविध सोई-सुविधांनी असा सुसज्ज आहे. खरेतर एमआयटीची ओळख ही अभियांत्रिकी शाखेच्या शिक्षणासाठी होती आणि आहे. परंतू आता एमआयटी शिक्षण समुह झपाट्याने विस्तारत असताना, काळानुरूप पुरक असे अभ्यासक्रम देखील विद्यार्थ्यांना पूरवत आहे. त्यातूनच कायद्याच्या अत्यंत महत्वाच्या क्षेत्रात सर्वांपेक्षा वेगळे शिक्षण द्यावे यासाठी स्कुल ऑफ लॉची स्थापना करण्यात आली. त्यामुळे आता आम्ही विद्यार्थ्यांना कायद्याच्या शिक्षणातील विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहोत असे मत प्रा. देव यांनी व्यक्त केले.

पाणथळींपाठोपाठ नवी मुंबईतील बेटावर निवासी संकुले!

● नवी मुंबई : येथील पामबीच मार्गालगतच्या पाणथळींना लागून खाडीच्या बाजूस असलेले काही एकरांचे एक मोठे बेटच निवासी संकुलांसाठी खुले करण्याचा निर्णय 'सिडको'ने घेतला आहे. या पाणथळी म्हणजे लाखो फ्लेमिंगोंचा अधिवास असून त्या बिल्डरांसाठी खुल्या करण्याचा नवी मुंबई महापालिकेचा निर्णय आधीच वादात सापडला असताना, सिडकोच्या या निर्णयामुळे वादात भर पडणार आहे. नैसर्गिक पाणथळी आणि ठाणे खाडी किनाऱ्याच्या मधोमध असलेल्या 'करावे द्वीपा'च्या नियोजनाचे संपूर्ण अधिकार राज्य सरकारने २०१७ मध्ये सिडकोकडे सोपविले होते. लोकसभा निवडणुकांची धामधूम सुरू असताना मार्च २०२४ मध्ये सिडकोने 'करावे द्वीपा'चा प्रारुप विकास आराखडा जाहीर केला. निवडणुकांच्या हंगामातच हरकती, सूचना मागविण्यात आल्या. आराखड्यानुसार, सिडकोने या द्वीपावरील विस्तीर्ण उद्यानासाठी असलेले आरक्षण बदलून ते रहिवासी वापरासाठी खुले करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. नवी मुंबईत फ्लेमिंगोंच्या अधिवासाची हक्काची ठिकाणे सीवूड्स, बेलापूर पट्ट्यात तयार झाली आहेत.

विधानसभा निवडणुकीत लोकंच त्यांच्या डोळ्यात अंजन घालतील - खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा टोला

विजयी हॅटट्रिकबद्दल कल्याणात राष्ट्रवादीतर्फे जाहीर सत्कार

● कल्याण : काही लोकांना वाटतं की आम्हाला सहानुभूती आहे, मात्र सहानुभूती असती तर ते लाखांच्या मतांनी निवडून आले असते. परंतू महाराष्ट्रात महविकास आघाडी आणि महायुतीच्या मतदानामध्ये केवळ 0.3 टक्क्यांचाच फरक असून आगामी विधानसभा निवडणुकीत लोकं तुमच्या डोळ्यात अंजन घातल्याशिवाय राहणार नाहीत अशा शब्दांत कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला.

कल्याण लोकसभेत सलग तिसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल खा. डॉ. शिंदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस कल्याण डोंबिवली जिल्ह्याच्या वतीने आणि जिल्हाध्यक्ष जगन्नाथ (आप्पा) शिंदे यांच्या पुढाकाराने जाहीर सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना खा. शिंदे यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांना या विजयाचे श्रेय देऊन आभार मानत विरोधकांचाही खरपूस समाचार घेतला.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या शिवसेनेची महाराष्ट्रात 19 टक्के मते असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या दोन वर्षांमध्ये विकासकामांचा जो झपाटा लावला. त्याने प्रेरित होऊन महाराष्ट्रातील मराठी माणूस बाळासाहेबांच्या शिवसेनेसोबत उभा राहिला. या 19 टक्क्यांपैकी 14.5 टक्के मतदान आम्हाला झाले असून उर्वरित मतदान विधानसभा निवडणुकीत आपल्याकडेच येईल असा विश्वास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. तर लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी चुकीचा नरेटिव्ह आणि लोकांची दिशाभूल करून एका विशिष्ट धर्म आणि जातीचे मतदान स्वतःच्या पारड्यात पाडून घेतले.

आंबिवली स्थानकाची विदारक स्थिती

● कल्याण : मध्य रेल्वेच्या आंबिली रेल्वे स्थानकातील फलट क्रमांक दोन मधील विदारक परिस्थितीने प्रवासी हैराण झाले आहेत. फलाटावरील टाकण्यात आलेले पत्र्याचे आच्छादन उन्हाळ्यात साफ केले जात नसल्याने पावसाचे साचलेले पाणी गळती लागल्याने फलाटावर इतरत्र पडत असल्याचे दिसून येत आहे. टाकण्यात आलेल्या पत्र्यांकडे रेल्वे प्रशासन कायम दुर्लक्ष करीत असल्याने पत्रे फुटलेल्या अवस्थेत तसेच नालिका तुटलेल्या आहेत. त्यामुळे फलाटावरील

बाकड्यांवर व चौथाऱ्यावर पाणी झिरपत असल्याने प्रवासी या ठिकाणी बसू शकत नसल्याचे समोर येत आहे. दोन नंबर फलाटाची दयनीय अवस्था झाली असून सुमारे 90% फलाटावरील पत्र्याचे आच्छादन पाणी गळतीने व्यापले आहे. फलाटावरील आहे त्या बाकड्यांवर पावसाचे पाणी पडत असल्याने अन्य ठिकाणी बसण्याकरता प्रवाशांकरिता बाकडे उपलब्ध नाहीत. फलाट क्रमांक एक वरील शेवटच्या भागातील जिन्या जवळील महिला बोगीजवळ पाणी साचत आहे. रात्रीच्या दरम्यान गर्दीच्या वेळी प्रवासी उतरत असताना अंधारात साचलेल्या पाण्यातून पाय टाकत जावे लागत आहे. एकीकडे प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना आंबिवली रेल्वे स्थानकाला महसूलही मोठ्या प्रमाणात मिळत आहे.

मात्र प्रवाशांच्या सुख सोयी

शाळेच्या प्रवेशव्दारावरील झाड तोडल्याने कल्याणमधील सेंट थॉमस शाळेला नोटीस

● कल्याण – कल्याण डोंबिवली पालिकेच्या उद्यान विभागाच्या कोणत्याही परवानग्या न घेता कल्याण पूर्व विजयनगर भागातील सेंट थॉमस शाळेने शाळेच्या प्रवेशव्दारावरील बदामाचे जुनाट झाड तोडले. या नियमबाह्य कृतीबद्दल पालिकेच्या उद्यान विभागाने शाळा व्यवस्थापनाला कारवाईची नोटीस पाठवून सात दिवसात खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी पालिका प्रशासनाचे आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून उपक्रम सुरू आहेत. शहर, परिसरात हरितपट्टे विकसित करण्यासाठी पालिका प्रशासना बरोबर, सामाजिक, पर्यावरण संवर्धन संस्थांनी पुढाकार घ्यावा म्हणून आयुक्त डॉ. जाखड प्रयत्नशील आहेत. अशा परिस्थितीत कल्याणमधील एका शिक्षण संस्थेने पालिकेच्या परवानग्या न घेता झाड तोडल्याबद्दल आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त करून याप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश उद्यान विभागाचे मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांना दिले आहेत. सेंट थॉमस शाळेला शाळेच्या प्रवेशव्दारावर एक प्रवेशव्दार उभारायचे आहे. या कामासाठी शाळेच्या प्रवेशवद्रारावरील बदामाचे २५ वर्ष जुने २५ फूट उंचीचे बदामाचे झाड अडथळा येत होते. हा अडथळा हटविण्यासाठी हे झाड धोकादायक नसताना ते तोडल्याने नागरिक, पालक नाराज झाले होते. उन्हाळ्यात शाळेच्या प्रवेशव्दारावर सावलीसाठी हे झाड मोठा दिलासा होते, असे पालक सांगतात. याप्रकरणी या भागातील काही जागरूक नागरिकांनी हा विषय पालिका आयुक्त, मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव यांच्या निदर्शनास आणला.

लोकसभेत दिलेल्या आश्वासनांची निलेश सांबरे यांच्याकडून पुर्तता

कल्याण तालुक्यातील विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम

● कल्याण : जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्यावतीने निलेश सांबरे यांच्या भगिनी तसेच भिवंडी लोकसभा प्रमुख मोनिका पानवे यांच्या वाढदिवसानिमित्त कल्याण तालुक्यातील विविध एकूण २३ ठिकाणी सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी आपण लोकसभेत जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करत असल्याचे सांबरे यांनी याप्रसंगी बोलाताना सांगितले .

नुकत्याच पार पडलेल्या लोसाभा निवडणुकीत जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे हे अपक्ष म्हणून भिवंडी लोकसभा क्षेत्रातून अपक्ष म्हणून उभे होते. या निवडणुकीत जरी त्यांचा पराभव झाला असला तरी देखील अपक्ष उमेदवार असतानाही त्यांना मिळालेली

मते ही लक्षवेधी होती. सुज्ञ असलेल्या मतदारांनी सांबरे यांनी आतापर्यंत केलेल्या कामाचा कौल त्यांना दिला होता म्हणूनच अश्या लोकांच्या मतांचा आदर राखून आपण पराभव झाला असला तरीही लोकसभा निवडणुकीत जे आश्वासन मी जनतेला दिले होते त्याची पूर्तता करण्याच्या उद्देश्याने आजचे हे उपक्रम चालू केले आहेत.

तसेच यापुढेही असे अनेक उपक्रम जनतेच्या सेवेत चालू राहतील. केवळ निवडणूक लढवणे हा हेतू कधीच नव्हता जनतेची कामे योग्यरीत्या झाली पाहिजेत. म्हणूनच आपण निवडणुकीला सामोरे गेलो होतो असे देखील सांबरे म्हणाले.

■ जिजाऊ भिवंडी लोकसभा प्रमुख मोनिका पानवे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत "वाढदिवस फक्त निमीत्त...उद्देश मात्र सामाजिक दायित्व..." या संकल्पनेखाली मोफत एकूण २३ ठिकाणी विविध सामाजिक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. यात मोफत आरोग्य केंद्र, अभ्यासिका, शिवण क्लास, रिक्षा प्रशिक्षण केंद्र, मेहंदी क्लासेस, स्पर्धा परीक्षा केंद्र रक्तदान शिबीर, रुग्णांना फळे वाटप निराधार मुलांसोबत स्नेहभोजन , ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यक्रम , ब्युटी पार्लर क्लासेस यांसारखे विविध कार्यक्रम संपन्न झाले. त्याचबरोबर जिजाऊच्या जनसंपर्क कार्यालयाचेही उद्घाटन करण्यात आले.

■ गरीब आणि गरजू व्यक्तीना या उउपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लाभ मिळावा हा जिजाऊ संस्थेचा उद्देश आहे. नागरीकांसाठी सुरु करण्यात आलेले आरोग्य केंद्र , विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका , महिलांसाठी विविध लघु उद्योगांचे प्रशिक्षण यांसारखे अनेक उपक्रम संस्था संपूर्ण कोकण विभागातील विविध ठिकाणी गेली १५ वर्ष राबवत आहे . आता कल्याणसह शहाड , आंबिवली आणि टिटवाळा परिसरातही व्यापक स्वरुपात हे उपक्रम राबविण्यात चालू करण्यात आले असून त्याचा जास्तीत जास्त लाभ येथील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन यावेळी निलेश सांबरे यांसह मोनिका पानवे यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी परिसरातील अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अफगाणिस्तानच्या ऐतिहासिक विजयानंतर ब्राव्होने केला 'चाम्पिअन वाला डान्स'



अफगाणिस्तान क्रिकेट संघासाठी २३ जून हा त्यांच्या क्रिकेट इतिहासातील सर्वात संस्मरणीय दिवस ठरला. टी-२० विश्वचषक २०२४ च्या सुपर-८ फेरीत अफगाण संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना २१ धावांनी जिंकला. या निकालाची कोणालाच अपेक्षा नव्हती पण अफगाणिस्तान संघाने पुन्हा एकदा आपल्या खेळाने सर्वांना चकीत केले मनंही जिंकली. या सामन्यानंतर अफगाण संघाचा आनंद मैदानावर दिसत असतानाच, स्टेडियमवरून हॉटेलवर परतत असताना संघाने बसमध्ये सेलिब्रेशनही केले, ज्याचा व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. गोलंदाजी प्रशिक्षक ड्वेन ब्राव्होही बसमध्ये नाचताना दिसला – टी-२० विश्वचषक २०२४ पूर्वी, अफगाणिस्तान संघाने आपल्या संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून वेस्ट इंडिजचा माजी अष्टपैलू खेळाडू ड्वेन ब्राव्होची नियुक्ती केली आहे. या सामन्यादरम्यान ब्राव्होही खूप सक्रिय दिसला, ज्यामध्ये तो सीमारेषेजवळ उभा राहून अफगाण संघाच्या गोलंदाजांना सतत सल्ला देत होता. हा सामना जिंकल्यानंतर त्याचा आनंद मैदानातही स्पष्ट दिसत होता. यानंतर, जेव्हा संघ बसने हॉटेलवर परतत होता, तेव्हा ब्राव्हो आपल्या 'चाम्पिअन-चाम्पिअन' या हिट गाण्यावर अफगाणिस्तान संघासोबत नाचतानाही दिसला. या संपूर्ण सेलिब्रेशनचा व्हिडीओ अफगाणिस्तान संघाचा स्टार खेळाडू मोहम्मद नबी याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर पोस्ट केला आहे.

एक संघ आणि देश म्हणून आमच्यासाठी मोठा विजय –

या स्पर्धेत अफगाणिस्तान संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत असलेल्या रशीद खानने या ऐतिहासिक विजयावर प्रतिक्रिया दिली. विजयानंतर रशीदने म्हणाला की, "एक संघ आणि एक देश म्हणून आमच्यासाठी हा मोठा विजय आहे. ही एक अद्भुत अनुभूती आहे, ज्याची गेल्या दोन वर्षांपासून आम्हाला उणीव भासत होती. या विजयाने मी खूश आहे आणि माझ्या खेळाडूंचा अभिमान आहे. या विकेटवर १४८ धावांची धावसंख्या चांगली होती. पण आम्ही फलंदाजीमध्ये तशी कामगिरी करू शकलो, ज्या प्रकारे आम्ही करु शकलो असतो."

हा आमच्यासाठी आणि आमच्या देशासाठी अभिमानाचा क्षण –

रशीद खान पुढे म्हणाला, "आमच्या सलामीच्या फलंदाजांनी आम्हाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतरही आम्ही स्वतःवर विश्वास ठेवला. आम्ही या क्षणाची बराच काळापासून वाट पाहत होतो. हा आमच्यासाठी आणि आमच्या देशासाठी अभिमानाचा क्षण आहे. आमच्या क्रिकेटसाठी मिळालेले हे खूप मोठे यश आहे. अखेर ऑस्ट्रेलियाला पराभूत करण्यात आम्हाला यश आले. क्रिकेटमधील आमचा इतिहास समृद्ध नाही. त्यामुळे हा विजय आमच्यासाठी खूप मोठा आहे."

अक्षय कुमारच्या सिनेमांवर लावलेले पैसे बुडाले

निर्माते वाशू भगनानी यांनी अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ यांच्या मुख्य भूमिका असलेला 'बडे मियाँ छोटे मियाँ' सिनेमा बनवण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांना या चित्रपटाकडून खूप आशा होत्या. अली अब्बास जफर दिग्दर्शित हा सिनेमा तब्बल ३५० कोटींच्या बजेटमध्ये तयार करण्यात आला. या चित्रपटाची रिलीजपूर्वी खूप चर्चा होती, पण बॉक्स ऑफिसवर हा सिनेमा सपशेल आदळला. सिनेमा फ्लॉप झाल्याने भगनानी यांच्या पूजा एंटरटेनमेंट प्रॉडक्शन हाऊसचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

या चित्रपटामुळे जे नुकसान झालं त्याचे २५० कोटी रुपयांचे कर्ज फेडण्यासाठी वाशू भगनानी यांनी मुंबईतील ऑफिस विकल्याची माहिती समोर आली आहे. आर्थिक तोट्यामुळे त्यांनी प्रॉडक्शन हाऊसने कर्मचारी कमी केले आहे. त्यांनी जवळपास ८० टक्के लोकांना कामावरून काढलं आहे. बॉलीवूड हंगामाच्या वृत्तानुसार, मोठं ऑफिस विकल्यानंतर आता मुंबईतील दोन बेडरूमच्या फ्लॅटमध्ये ऑफिस बनवण्यात आलं आहे. मात्र अद्याप प्रॉडक्शन हाऊसने याबद्दल कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

"हे सर्व २०२१ मध्ये करोनाच्या साथीनंतर चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेल्या पहिल्या हिंदी चित्रपटांपैकी एक असलेल्या 'बेल बॉटम'पासून सुरू झालं. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. त्यानंतर 'मिशन राणीगंज'ही सपशेल आदळला. त्यानंतर टायगर श्रॉफचा बिग बजेट 'गणपत'देखील फ्लॉप ठरला. इतकंच नाही तर डील झाल्यावरही नेटफ्लिक्सने हा चित्रपट प्रदर्शित करण्यास नकार दिला, त्यामुळे या कर्जात भर पडत गेली. मग प्रॉडक्शन हाऊसने 'बडे मियाँ छोटे मियाँ'मध्ये गुंतवणूक केली, हा चित्रपट हिट झाल्यास परिस्थिती सुधारेल अशी आशा भगनानी यांना होती. पण चित्रपट फ्लॉप झाला आणि त्यांच्यावरील कर्जाचा डोंगर आणखी वाढला. आता हे कर्ज फेडण्यासाठी वाशू यांच्याकडे ऑफिस विकण्याशिवाय पर्याय नव्हता," असं वृत्त 'बॉलीवूड हंगामा'ने सूत्रांच्या हवाल्याने दिलं आहे.

गौरव मोरेच्या 'अल्याड पल्याड'ने आठव्या दिवशी कमावले १७ लाख रुपये, सिनेमाचे एकूण कलेक्शन...

१९८६ मध्ये पूजा एंटरटेनमेंटची स्थापना करण्यात आली. या प्रॉडक्शन हाऊसने आजपर्यंत सुमारे ४० चित्रपटांची निर्मिती केली आहे. कंपनीने डेव्हिड धवन दिग्दर्शित 'कुली नंबर १', 'हिरो नंबर १', 'बीवी नंबर १' आणि 'बडे मियाँ छोटे मियाँ', 'रहना है तेरे दिल में' आणि 'ओम जय जगदीश' सारख्या चित्रपटांची निर्मिती केली. पण अलीकडचे काही सिनेमे फ्लॉप झाल्याने कंपनी कर्जात बुडाली आहे.

'मिर्झापूर' मधील इंटिमेट सीनबद्दल अभिनेत्री रसिका दुग्गल म्हणाली, "रिहर्सलच्या वेळीच मला जाणवलं की..."

'बडे मियाँ छोटे मियाँ' बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाल्यानंतर प्रॉडक्शन हाऊसला आणखी अडचणींचा सामना करावा लागला, ३५० कोटी रुपयांची गुंतवणूक करूनही हा चित्रपटाने फक्त ५९.१७ कोटी रुपये कमावले. दरम्यान, काही दिवसांपूर्वी कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार न दिल्याचे आरोप पूजा एंटरटेनमेंटवर झाले होते.

आफ्रिकेत खातात 'डासांचा बर्गर'!

सध्या सोशल मीडियावर आफ्रिकेत डासांपासून तयार करून खाल्ल्या जाणाऱ्या बर्गरची तुफान चर्चा होत आहे. मात्र, या डासांनी तयार होणाऱ्या बर्गरवर इंटरनेटवर संमिश्र स्वरूपाच्या प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. अनेकांना कोणत्याही प्रकारचे कीटक खाण्याची पद्धत ही प्रचंड किळसवाणी आणि विचित्र वाटत असली तरीही हा प्रकार आरोग्य आणि पर्यावरणासाठी फायदेशीर ठरू शकते, असे दी इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून समजते.

इन्स्टाग्राम या सोशल मीडियावरील अशोक [@_masalalab] नावाच्या कन्टेन्ट क्रिएटरने या आफ्रिकेतील डासांच्या बर्गरबद्दल माहिती देणारा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये अशोक म्हणतात, "अलीकडेच व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये आफ्रिकेतील लोक डासांपासून बनविलेला बर्गर खाताना दिसत आहेत. या बर्गरमधील एक पॅटी ही जवळपास सहा लाख डासांपासून बनवली जाते. पावसाळ्यात व्हिक्टोरिया तलावाजवळ पैदास होणाऱ्या डासांचा वापर यासाठी केला जातो."

"अनेकांना किडे खाण्याची ही कल्पना अतिशय किळसवाणी वाटू शकते आणि साहजिकच असे खाद्य खाणे आरोग्यासाठी योग्य नसल्याचेदेखील बहुतेकांचे मत असेल. मात्र, तुम्ही अगदी चुकीचा विचार करीत आहात." असे पुढे अशोक म्हणतात. मात्र, अशा प्रकारचे डास आणि किडे खाण्याबद्दल तज्ज्ञांचे काय मत आहे ते आपण जाणून घेऊ...

किडे-कीटक खाण्याबद्दल तज्ज्ञ काय म्हणतात?

'हंग्री कोआला' येथील [Hungry Koala] वरिष्ठ आहारतज्ज्ञ इप्सिता चक्रवर्ती या अशोक यांच्या मताशी सहमत आहेत. "कीटकांमध्ये मुबलक प्रमाणात पोषक घटक असतात. अनेकदा त्यांमधील प्रथिनांचे प्रमाण हे पारंपरिक मांसाहारातील प्रमाणापेक्षादेखील अधिक असते. कीटक हे उच्च गुणवत्ता असणाऱ्या

प्रथिनांचे स्रोत असून, त्यांमध्ये शरीरास आवश्यक असणारे अमिनो ॲसिडदेखील उपलब्ध असते", असे त्या म्हणतात.

आहारतज्ज्ञ चक्रवर्ती यांच्या मतानुसार, कीटकांमध्ये बी-१२ आणि रिबोफ्लेव्हिनसारखी विविध जीवनसत्त्वे, लोह, झिंक व मॅग्नेशियमसारखी आवश्यक खनिजे उपलब्ध असतात. "काही कीटकांमध्ये ओमेगा ३ व ओमेगा ६ फॅटी ॲसिडसारखे घटकदेखील उपलब्ध असतात. इतकेच नव्हे, तर पचनशक्तीसाठी उपयुक्त असणारे काइटिन नामक फायबरसुद्धा कीटकांमध्ये सापडते", असे त्या म्हणतात.

जागतिक पातळीवर कीटक खाण्याची संस्कृती कशी निर्माण झाली?

"एंटोमोफॅजी म्हणजेच किडे खाण्याची पद्धत ही आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिकेमध्ये कित्येक वर्षांपासून अस्तित्वात आहे. मात्र, पाश्चिमात्य समाजाने या पद्धतीचा कायमच तिरस्कार केला आहे. परंतु, आता ही परिस्थिती बदलली असून, अनेक जण कीटकांकडे खाण्यास आरोग्यदायी आणि आहाराचा सस्टेनेबल स्रोत म्हणून पाहू लागले आहेत", असे चक्रवर्ती यांनी सांगितले आहे.

कीटकांचे सेवन करणे ही सामान्य बाब असून, याबद्दल जनजागृती करण्यासाठी रूढी-परंपरा यांच्या बंधनांपलीकडे जाऊन आणि पाककलेच्या नवीन कल्पना महत्त्वपूर्ण ठरू शकतात.

कीटकांच्या शेतीसह आहाराचे पर्यावरणाला होणारे फायदे

कीटकांची शेती करणे हा पशुपालनापेक्षा कितीतरी पटींनी टिकाऊ [सस्टेनेबल] पर्याय आहे. "कीटक, डुक्कर व गुरांच्या तुलनेत अतिशय कमी प्रमाणात हरितगृह वायू [greenhouse gas] निर्माण करतात; ज्यामुळे ते पर्यावरणास अनुकूल ठरून, प्रथिनांचे स्रोत म्हणून काम करू शकतात", असे चक्रवर्ती म्हणतात.

दुसरे म्हणजे पारंपरिक पद्धतीत जनावरांना खाऊ घालण्याच्या तुलनेत, कीटकांना खाऊ घालण्याची आवश्यकता कमी असते. असे असले तरीही कीटकांमधून मुबलक प्रथिने मिळू शकतात.

कीटक खाताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी?

"प्रत्येक खाद्यपदार्थाप्रमाणेच कीटक खातानाही सुरक्षितता महत्त्वाची आहे. बहुतांश कीटक कमी धोकादायक आणि खाण्यायोग्य असले तरीही काही विशिष्ट कीटकांच्या सेवनाने व्यक्तीला ॲलर्जीदेखील होऊ शकते", असे चक्रवर्ती म्हणतात. कीटकांची शेती ही अनियंत्रित वातावरणात [uncontrolled environments] केली जाते. त्यामुळे कीटकांमध्ये कीटकनाशके, जड धातू अथवा विविध दूषित पदार्थ असण्याची शक्यता असते. मात्र, यांसारख्या समस्या दूर करण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करून कीटकांची शेती करणे महत्त्वपूर्ण आहे, असे आहारतज्ज्ञ चक्रवर्ती यांचे म्हणणे आहे, अशी माहिती दी इंडियन एक्स्प्रेसच्या एका लेखावरून मिळते.

दिनविशेष

घटना

२०००: मॅडम तुसाँ यांच्या मेणांच्या पुतळ्यांचा जगप्रसिद्ध प्रदर्शनात भारतीय सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा पुतळा उभारण्याचे ठरले.

१९९३ : किम कँपबेल - यांनी कॅनडाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

१९९१: स्लोव्हेनिया - देशाने युगोस्लाव्हियापासून स्वातंत्र्य घोषित केले.

१९९१: क्रोएशियाने - देशाने युगोस्लाव्हियापासून स्वातंत्र्य घोषित केले.

१९८३ : क्रिकेट विश्वकप भारतीय क्रिकेट संघाने १९८७चा क्रिकेट विश्वकप जिंकला.

१९७८: गे फ्रीडम डे परेड, सॅन फ्रान्सिस्को, अमेरिका - या दरम्यान समलिंगी अभिमानाचे प्रतिनिधित्व करणारा इंद्रधनुष्य ध्वज पहिल्यांदा फडकवण्यात आला.

१९७५ : मोझांबिक देशाने पोर्तुगालपासून स्वातंत्र्य मिळवले.

जन्म

१९८६ : सई ताम्हनकर अभिनेत्री

१९७८ : आफताब शिवदासानी हिंदी चित्रपट अभिनेते १९७५: व्लादिमिर क्रामनिक- रशियन बुद्धीबळपटू

१९७४ : करिश्मा कपूर हिंदी चित्रपट अभिनेत्री

१९३३ : जेम्स मेरेडिथ - अमेरिकन नागरी हक्क कार्यकर्ते, मिसिसिपीच्या विद्यापीठात प्रवेश मिळवलेले पहिले आफ्रिकन-अमेरिकन

१९३१ : व्ही. पी. सिंग - भारताचे ७वे पंतप्रधान (निधन: २७ नोव्हेंबर २००८)

१९२८: अलेक्सेई अलेक्सेयेविच अब्रिकोसोव्ह - रशियन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पुरस्कार

१९२८ : पेओ - द स्मर्फचे निर्माते (निधन: २४ डिसेंबर १९९२)

१९२४: मदन मोहन - भारतीय संगीतकार, संगीत दिग्दर्शक - राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (निधन: १४ जुलै १९७५)

निधन

२००९: मायकेल जॅक्सन अमेरिकन गायक (जन्म: २९ ऑगस्ट १९५८)

२००७: जीवा - भारतीय दिग्दर्शक, सिनेमॅटोग्राफर आणि पटकथा लेखक (जन्म: २१ सप्टेंबर १९६३)

२००६: वि. ग. भिडे - शास्त्रज्ञ व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक पद्मश्री (जन्म: ८ ऑगस्ट १९२५)

२०००: रवीबाला सोमण-चितळे - मिश्र दुहेरीतील माजी राष्ट्रीय बॅडमिंटन विजेत्या

१९९७ : जॅक - इवेसकुस्तू फ्रेंच संशोधक

१९९५: अर्नेस्टथॉमस सिंटन वॉल्टन आयरिश भौतिकशास्त्रज्ञ नोबेल पुरस्कार

१९९५: अर्नेस्ट वॉल्टन - आयरिश भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पुरस्कार (जन्म: ६ ऑक्टोबर १९०३)

झहीर इक्बालशी आंतरधर्मीय लग्नामुळे होतंय ट्रोलिंग, सोनाक्षी सिन्हाने उचललं मोठं पाऊल

सोनाक्षी सिन्हा व झहीर इक्बाल लग्नबंधनात अडकले आहेत. दोघांनी नोंदणी पद्धतीने लग्न केलं. त्यांच्या लग्नाचे फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. सोनाक्षीने नोंदणी पद्धतीने लग्न केल्यावर काही खास फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले, त्यासोबत तिने एक सुंदर कॅप्शन लिहिलं होतं. सात वर्षांच्या रिलेशनशिपनंतर या जोडप्याने लग्न केलं आहे.

सोनाक्षीने पती झहीर इक्बालबरोबर

इन्स्टाग्रामवर कोलॅब करत फोटो पोस्ट केले आहेत. "सात वर्षांपूर्वी (२३.०६.२०१७) आम्ही एकमेकांच्या डोळ्यात प्रेम पाहिलं आणि ते टिकवण्याचा निर्णय घेतला. त्याच प्रेमानं आज आम्हाला सर्व आव्हानांमध्ये व यशामध्ये मार्गदर्शन करत या क्षणापर्यंत आणलं आहे. आमच्या दोन्ही कुटुंबांच्या आणि आमच्या दोन्ही देवांच्या आशीर्वादानं आम्ही पती-पत्नी झालो आहोत," असं कॅप्शन तिने या फोटोंना दिलं. पण तिने या पोस्टचं कमेंट सेक्शन बंद केल्याचं पाहायला मिळालं.

लग्नानंतर झहीर इक्बालने घेतले सासू-सासऱ्यांचे आशीर्वाद, व्हिडीओ पाहून नेटकरी म्हणाले, "ते एकमेकांच्या संस्कृतीचा..." सोनाक्षी व झहीर यांच्या लग्नाची तारीख ठरल्यापासून सोशल मीडियावर ट्रोलिंग होत आहे.

अडीच वर्षांचा असतानाच नाना पाटेकरांच्या मोठ्या लेकाचं झालं निधन

मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीत मोठा चाहता वर्ग असलेले अभिनेते म्हणजे नाना पाटेकर. आजवर त्यांनी विविधांगी भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. त्यांनी अनेक उत्कृष्ट कलाकृती सिनेसृष्टीला दिल्या आहेत. नाना पाटेकरांनी अभिनयाबरोबर आपल्या स्पष्टवक्तेपणाने आणि साधेपणाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. अशा प्रसिद्ध

नाना पाटेकरांनी नुकतीच 'द लल्लनटॉप'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेक गोष्ट सांगितल्या. तसंच मोठ्या लेकाच्या मृत्युबद्दल त्यांनी मौन सोडलं. त्याच्या आठवणीत खुलेपणाने बोलत ते भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

नाना पाटेकरांनी मुलाखतीमध्ये आधी आपल्या आईविषयी सांगितलं. ते म्हणाले, "आपल्या आईबद्दल काय बोलावं; तिच्यामुळेच आज अस्तित्वात आहे. आईकडील सर्व लोक अंडरवर्ल्डमधील होते. माझ्या मामाचाही अंडरवर्ल्डशी संबंध होता. मी तसा होऊ नये म्हणून आई मला घेऊन गावी गेली.

राशि भविष्य

मेष मनावर झालेल्या आघातामुळे तुम्हाला प्रचंड धैर्य आणि शक्ती पणाला लावावी लागेल. तुमच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे तुम्ही यावर सहजपणे मात कराल. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका. गुंतवणुकीचा सर्व बाजूंनी विचार केल्याशिवाय पुढे जाऊ नका, अन्यथा नुकसान होऊ शकते.

वृषभ तुमच्या इच्छा प्रत्यक्षात येण्यासाठी तुमचे विचार आणि ऊर्जा वापरा, केवळ कल्पनाविश्वात रमण्यात काहीही अर्थ नाही. तुम्ही केवळ विचार करता, प्रयत्न करत नाही हा तुमचा खरा प्रश्न आहे. मागच्या दिवसात तुम्ही जितके धन आजचा काळ उत्तम बनवण्यासाठी गुंतवणूक केली होती त्याचा फायदा आज तुम्हाला मिळू शकतो.

मिथुन स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. आज तुमच्यासमोर सादर झालेल्या गुंतवणूक योजनांचा नीटपणे विचार करायला हवा. कौटुंबिक व्यावसायिक प्रकल्प सुरु करण्यास शुभ दिवस. चांगले यश मिळण्यासाठी कुटुंबातील इतर सदस्यांची मदत घ्या.

कर्क तंदुरुस्ती आणि वजन घटविण्याचे उपक्रम आपल्या शरीरास चांगला आकार देण्यासाठी उपयोगी ठरतील. आज कुणी विपरीत लिंगीच्या मदतीने तुम्हाला व्यवसायात किंवा नोकरीमध्ये आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील लोकांमध्ये पैश्याला घेऊन आज वाद होऊ शकतात.

सिंह तुमची देण्याची वृत्ती म्हणजे अप्रत्यक्ष मदत करण्याची वृत्ती होय. त्यामुळे शंका, निरुत्साह, अश्रद्धा, मत्सर, हेवा, गर्व यापासून तुम्ही मुक्त व्हाल. अतिखर्च, उधळेपणा आणि शंकास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतणे टाळा. तुमच्या उदार वागणुकीचा तुमचे नातेवाईक विनासायास फायदा घेण्याची शक्यता आहे.

कन्या तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. कुटुंब-मुले आणि मित्रमंडळी यांच्यासमवेत वेळ घालवल्याने तुमच्या मनाला पुन्हा एकदा उभारी मिळेल.

तूळ सामाजिक आयुष्यापेक्षा आरोग्याला प्राथमिकता द्यावी लागेल. काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल. आज तुमच्या कृतीमुळे तुमच्यासोबत राहात असलेली व्यक्ती प्रचंड त्रासून जाईल. तुमचा प्रेमी आज तुमच्या गोष्टीला ऐकण्यापेक्षा जास्त आपल्या गोष्टी सांगणे पसंत करेल ज्यामुळे तुम्ही थोडे खिन्न होऊ शकतात.

वृश्चिक पुन्हा ऊर्जा मिळविण्यासाठी संपूर्ण विश्रांती घ्या. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा आणि ऑफिस मध्ये सर्वांसोबत चांगल्या प्रकारे व्यवहार करा जर तुम्ही असे केले नाही तर, तुमची नोकरी जाऊ शकते आणि तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

धनु चार भिंतीबाहेरील उपक्रम तुमच्यासाठी लाभदायक ठरतील. बंदिस्त किल्ल्याप्रमाणे स्वत:भोवती सुरक्षित चौकट आखून त्याचाच विचार करण्याची जीवनशैली तुमच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्यासाठी मारक आहे. तुम्हाला ही जीवनशैली चिंताग्रस्त आणि उदास बनवणारी असते.

मकर त्रस्त आणि व्यस्त असे कामाचे वेळापत्रक तुम्हाला शीघ्रकोपी बनवेल. जे लोक आपल्या जवळच्या किंवा नातेवाईकांसोबत मिळून बिझनेस करत आहे त्यांना आज खूप विचार करून पाऊल ठेवण्याची आवश्यकता आहे अन्यथा आर्थिक नुकसान होऊ शकते. तुमच्या उदार वागणुकीचा तुमचे नातेवाईक विनासायास फायदा घेण्याची शक्यता आहे.

कुंभ बोलण्यापूर्वी दोनवेळा विचार करा. तुमच्या बोलण्यामुळे अनवधानाने कुणाच्या तरी भावना दुखावल्या जातील. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून आजच्या दिवशी तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते आणि तुम्ही कुठल्या मोठ्या अडचणींमधून निघू शकतात.

मीन आपल्या मुलांच्या कामाचा तुम्हाला अपरिमित आनंद होईल. तुम्हाला अफलातून नव्या संकल्पना सुचतील ज्यामुळे आर्थिक फायदा संभवतो. नोतवाईक व मित्रमंडळींकडून अनपेक्षित भेटवस्तू मिळतील. जे लोक तुमच्या प्रेमी पासून दूर राहतात त्यांना आज आपल्या प्रेमीची आठवण त्रास देऊ शकते.

मुला-मुलींना समान संधी देण्यास प्राधान्य - ऑलिम्पिक दिनाच्या निमित्ताने क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचे आश्वासन

● पुणे - प्रत्येक देशात खेळामध्ये मुला मुलींना समान संधी दिली जाते. याची अंमलबजावणी आपल्याकडेही व्हायला हवी आणि यासाठी महाराष्ट्र शासन पुढाकार घेईल, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी केले. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने आणि महाराष्ट्र क्रीडा संचालनालयाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या ऑलिम्पिक दिनाच्या कार्यक्रमात ते पुण्यात बोलत होते.

क्रीडा मंत्र्यांनी या वेळी शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या विविध निर्णयांची माहिती दिली. खेलो इंडिया आणि राष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करून महाराष्ट्राचे नाव उंचावणाऱ्या खेळाडूंचा आम्हाला अभिमान वाटतो. यासाठीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी क्षणाचाही विलंब नं लावता खेळाडूंच्या पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ केली. क्रीडा सुविधा उपलब्ध होण्यासाठी तालुका क्रीडा संकुलांना ५ कोटी आणि जिल्हा संकुलांना १० कोटी रुपये अनुदान देत असल्याचेही बनसोडे यांनी सांगितले. आता महाराष्ट्राच्या खेळाडूंचे सातत्य असेच कायम राहिल्यास ही रक्कम तिप्पट केली जाईल असं आश्वासनही बनसोडे यांनी भाषणात दिले. न्यायालयीन वादात अडकल्यामुळे विलंब झालेल्या शिवछत्रपती पुरस्कारांचे वितरण देखील लवकरच एका भव्य दिव्य सोहळ्याच्या माध्यमातून करू असं आश्वासनही मंत्री बनसोडे यांनी ऑलिंपिक असोसिएशनच्या मागणीनंतर दिले.

भारताने ऑलिम्पिक खेळाच्या आयोजनाची तयारी दाखवली आहे. ऑलिम्पिक महाराष्ट्रात व्हावं यासाठी आम्ही जरुर प्रयत्न करु. खेळाडूंना समोर ठेवून काम करणारा मी मंत्री आहे. त्यामुळे खेळाडूंच्या अडीअडचणी समजून त्या पूर्ण करण्यास माझे प्राधान्य असते. शिवछत्रपती पुरस्कार वितरण सोहळा काही कारणांनी रखडला आहे. पण, लवकरच या सोहळ्याचा दिवस निश्चित करून भव्य स्वरुपात हा कार्यक्रम घेण्याचेही आश्वासन बनसोडे यांनी दिले. ऑलिम्पिक दिनाच्या शुभेच्छा देताना श्री. बनसोडे यांनी इनडोअर क्रीडा सुविधांसाठी ७ लाख रुपयांची आर्थिक मदतही जाहीर केली.

ऑलिम्पिक ही क्रीडा स्पर्धा नाही, ही एक चळवळ आहे. यासाठी खेळाडू अपार मेहनत घेत असतो. ऑलिम्पिक खेळण्याची प्रत्येक खेळाडूची इच्छा असते आणि खेळायला मिळाल्यावर तो खेळाडूचा अभिमान असतो. त्यामुळेच खेळासाठी तन,मन, धन असे सर्वस्व अर्पण करावे लागले, अशा शब्दात ऑलिंपिक पटू नेमबाज अंजली भागवत यांनी ऑलिम्पिकचे महत्व विशद केले.

ऑलिम्पिक दिनाचे औचित्य साधून याची देशात प्रगती व्हावी असे वाटत असेल, तर सगळी व्यवस्था एका चांगल्या व्यक्तीकडे दिली जावी अशी अपेक्षा आपण सर्वजण आजच्या ऑलिम्पिक दिनी व्यक्त केली तर ती चूक ठरणार नाही, असेही अंजली भागवत म्हणाल्या.

ऑलिम्पिक यजमानपदासाठी भारताने उत्सुकता दाखवली हे खूप चांगले आहे. दुसऱ्या देशात ऑलिम्पिकच्या तयारीला सुरुवात देखील झाली आहे आपण मात्र अजून आराखडा बनवण्यातच अडकून पडलो आहोत, त्यामुळे या तयारीला गती देण्याची गरज अंजली यांनी व्यक्त केली. भारताचे माजी हॉकी कर्णधार धनराज पिल्ले यांनी आपल्या भाषणात क्रीडा मंत्र्यांच्या घोषणांचा उल्लेख करत खेळाडूंवर अन्याय होणार नाही याकडे सर्वाधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले.

देशासाठी क्रीडा क्षेत्रात मोठी कामगिरी करणारे धनराज पिल्ले, अंजली भागवत, देविंदर वाल्मिकी, विक्रम पिल्ले यांच्यासह अनेक ऑलिम्पियन तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडापटू या ऑलिंपिक दिनानिमित्त आयोजित समारोहाला उपस्थित होते.

सकाळी लालमहाल येथून श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून क्रीडा रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीतही अनेक खेळाडू, क्रीडा संघटक उपस्थित होते. स. प. महाविद्यालयात रॅलीची सांगता झाल्यावर झालेल्या सोहळ्यात क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते उपस्थित ऑलिम्पियन खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर जिम्नास्टिक, वूशू, मार्शल आर्ट, मुष्टीयुद्ध, तायक्वांदो, योगासन, मल्लखांब अशा अनेक खेळांची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली.

साताऱ्यात प्रा . शिक्षक बँकेची वार्षिक सभा अभुतपूर्व गोंधळाविना

● सातारा - सातारा येथील प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची निवडणूक व गोंधळ हे समीकरण झाले होते. पण, बँकेच्या शताब्दी महोत्सव वर्षा निमित्त ७७ व्या वार्षिक सभेमध्ये सर्वच प्राथमिक शिक्षक सभासदांनी आचरण चांगले ठेवले . ही वार्षिक सभा अभुतपूर्व गोंधळाविना पार पडली. त्यामुळे प्राथमिक शिक्षक बँकेच्या सर्व सभासदांना सातारकरांनी धन्यवाद देऊन त्यांना शताब्दी महोत्सवी वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा मोरया लॉन्स मंगल कार्यालय, दत्तनगर, सातारा-रहिमतपूर रोड कोडोली या ठिकाणी दुपारी एक वाजता सरस्वती पूजन व दीप प्रज्वलाने सुरू झाली. प्रारंभी स्वागत व श्रद्धांजली आणि प्रस्ताविक भाषण व विषय पत्रिकेच्या कामकाज , वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून तसेच अहवाल सादर केल्यानंतर शांततेने वाटचाल करत सभा सुरू झाली. ऐनवेळीच्या विषयाने सभेला सर्व विषय एकमतने मंजूर करण्यात आले.

प्राथमिक शिक्षक संघ व प्राथमिक शिक्षक समिती आणि इतर संघटना या सर्वांच्या सहकार्याने सभेपूर्वीच सर्वांनी एकमेकांशी समझोता करून शताब्दी महोत्सवी वर्षात प्राथमिक शिक्षक बँकेच्या वार्षिक सभा शांततेत पार पाडण्याचे सूचिन्ह दाखवले. बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांनाही त्यामुळे चांगलाच आराम मिळाला. चेअरमन किरण यादव, व्हाईस चेअरमन शहाजी खाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी छगन खाडे ,बँकेचे संचालक नवनाथ जाधव ,संजीवनी जगदाळे, विजय ढमाळ, सौ पुष्पलता बोबडे, राजेंद्र बोराटे, विजय बनसोडे ,शशिकांत सोनवलकर, नितीन काळे, तानाजी कुंभार, सुरेश पवार, सौ निशा मुळीक, नितीन फरांदे, विशाल कणसे, ज्ञानबा डाबरे, संजय संकपाळ यांनी विविध विषयाला सूचक व अनुमोदक म्हणून आपली भूमिका जाहीर केली.

या सभेला सर्व प्राथमिक शिक्षक सभासदांनी शांततामय वातावरण कायम राखण्यासाठी समंजस भूमिका घेतली. हे आकर्षणाचे केंद्र ठरले. संचालक व शिक्षक सभासद यांनी या वार्षिक सभेला आपली भूमिका विशद करताना प्राथमिक शिक्षक बँकेने घेतलेल्या निर्णयाचा आढावा घेतला. अ वर्ग असलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड सातारा या बँकेचे 'आपली बँक आपली माणसं' हे घोषवाक्य या ठिकाणी तंतोतंत पाळण्यात आले. याचा सार्थ अभिमान प्राथमिक शिक्षकांच्या सर्व संघटनेला वाटला आहे. खरं म्हणजे शिक्षक बँकेची प्रगती ही सत्ताधाऱ्यांसोबत विरोधकांनी दाखवलेल्या समंजसपणामुळे अधिक उंचावणारी आहे.

मूनवली येथील तलावात दोन मुलांचा बुडून मृत्यू

सोशल मीडियावर केलेल्या आवाहानंतर मुलांनी मोठ्या शिताफीने दोन्ही मृतदेह तलावातून काढले बाहेर

● अलिबाग - अलिबाग तालुक्यातील मूनवली येथील तलावात रविवार दि.२३ जून रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दोन मुलांचा पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार मूनवली पंचक्रोशीतील आठ मुलांचा ग्रुप मूनवली येथे वर्षासहलीसाठी आला होता, त्यातील अथर्व शंकर हाके वय अंदाजे १६ वर्षे व शुभम विजय बाला वय अंदाजे १५ वर्षे हे पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला. बुडालेल्या दोन्ही मुलांना वाचवण्यासाठी सोशल मीडियावर आवाहन करण्यात आले होते, यावेळी परिसरातील काही मुलांनी प्रतिसाद देत घटनास्थळी धाव घेऊन मुलांना शोधण्यात मेहनत घेतली असता त्यांना साधारण दोन तासांनी यश मिळाले. यामध्ये अथर्व शंकर हाके रा. मूनवली याला प्रथम शोधून बाहेर काढले, तर शुभम विजय बाला रा. तुडाळ याला सुमारे अर्ध्या तासाने बाहेर काढण्यात यश मिळाले. अलिबाग पोलिसांनी घटनास्थळी हजर होते. अधिक तपास अलिबाग पोलीस करत आहेत. घटना घडल्यानंतर घटनास्थळी पंचक्रोशीतील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोकण पदवीधर मतदारसंघात ॲड. शैलेश वाघमारे यांचा विजय निश्चित

बहुजन विद्यार्थी संघटना कोकणात २५ वर्षे कार्यरत असल्याने ही लढाई आमच्यासाठी सोपी - अनिल वाणी

● वावोशी - कोकण पदवीधर मतदार संघात बहुजन विद्यार्थी संघटना हि कोकणात २५ वर्षे सातत्याने कार्यरत असल्याने ही लढाई आमच्यासाठी सोपी असून आमचा उमेदवार ॲड. शैलेश वाघमारे यांचा विजय अधिक मताधिक्याने निश्चित असल्याचा विश्वास बहुजन विद्यार्थी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल वाणी यांनी व्यक्त केला आहे ते रायगड जिह्यातील शैलेश वाघमारे यांचा प्रचार सभेत बोलत होते. बहुजन विद्यार्थी संघटना कोकण पदवीधर मतदार संघातून निवडून आल्यावर शिक्षणाच्या खाजगीकरण बाजारीकरणाच्या विरोधात विधिमंडळात आवाज उठवणार असून पदवीधरांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांचा आवाज बनून काम करेन. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिप, फ्री शिप अबाधित राहण्यासाठी कटिबद्ध असेन.

कोकण पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार रमेश कीर यांना उरण तालुक्यातून सर्वात जास्त लीड देण्याचा महाविकास आघाडीचा निर्धार

● उरण - रविवार दिनांक २३ जून २०२४ रोजी कोकण पदवीधर मतदार संघाचे उमेदवार रमेश कीर यांच्या प्रचारार्थ उरण येथील आनंदी हॉटेलमध्ये महाविकास आघाडीचा मेळावा पार पडला. सभेच्या सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस दिवंगत प्रशांत पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली, या मेळाव्यास शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेनेचे माजी आमदार मनोहरशेठ भोईर व काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आर सी घरत यांनी मार्गदर्शन केले, यावेळी सर्व मान्यवरांनी मार्गदर्शन करताना महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर यांना उरण तालुक्यातून जास्त जास्त लिड देण्याचा निर्धार व्यक्त केला व २६ तारखेला मतदान केंद्रावर महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहायचे आहे तसेच उरण तालुक्यातील ज्या पदवीधारांची नावे मतदार यादीत आहेत त्यांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे सर्व मान्यवरांनी आवाहन केले.

या मेळाव्यास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर,विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत, शेका पक्षाचे ज्येष्ठ नेते एल बी पाटील शिवसेनेचे तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, माजी सभापती नरेश घरत, रमाकांत पाटील, काँग्रेस नेते कमलाकर घरत,अकलाख शिल्लोत्री, शिवसेना गटनेते गणेश शिंदे, माजी नगरसेवक बबन कांबळे, उपजिल्हा संघटिका ममता पाटील, तालुका संघटिका श्रीमती सुजाता गायकवाड, काँग्रेस तालुका अध्यक्ष श्रीमती रेखा घरत , शेकाप तालुका अध्यक्ष सीमा घरत, नगरसेविका ॲड वर्षा पाठारे, नायदा ठाकूर, अफशा मुखरी, विधानसभा संघटिका ज्योती म्हात्रे, शहर संघटिका मेघा मेस्त्री, विना तलरेजा, उपतालुका संघटिका मनीषा ठाकूर, सुजाता पाटील, अल्पसंख्यांक सेलच्या तालुकाध्यक्ष हुसेना शेख, शहराध्यक्ष मुमताज भाटकर, शाखा संघटिका हसीमा सरदार, रंजना तांडेल, नयना पाटील, उपतालुकाप्रमुख कमलाकर पाटील, मधुसूदन पाटील, उपतालुका संघटक के एम घरत, रुपेश पाटील, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, काँग्रेस शहर अध्यक्ष प्रकाश पाटील, शेकाप शहर चिटणीस शेखर पाटील, द्रोणागिरी शहरप्रमुख जगजीवन भोईर, युवासेना तालुका अधिकारी करण पाटील, सोशल मीडिया समन्वयक नितीन ठाकूर, द्रोनागिरी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र पाटील, महाविकास आघाडीचे सर्व पक्षांचे सर्व जिल्हा परिषद विभाग वाईज पदाधिकारी शहरातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Delhi High Court denies interim bail on medical grounds to Hyderabad businessman

● New Delhi - The Delhi High Court on Friday denied interim bail to Hyderabad businessman Arun Ramachandran Pillai, an accused in the excise policy case being probed by the Enforcement Directorate, after noting that his medical reports did not indicate him "suffering from any life-threatening ailment".

seeking interim bail for eight weeks, stating that he had been suffering from lower back aches for the past eight years and that his condition was not improving despite treatment being given in jail. Pillai said he wishes to undergo panchakarma therapy at a clinic in Kerala for 21 days to "sustainably heal his back pain".A single-judge bench of Justice Ravinder Dudeja, in its June 21 order, observed, "The court is conscious of the state's responsibility to provide adequate medical care to the accused. However, (the) need of seeking bail on medical grounds arises only when the prison authorities/referral hospitals are incapable of providing required care or treatment essential for the treatment of the accused. Essentially, the ailment should be of such a nature that if the accused is not released on bail, he cannot be ensured proper treatment for his ailment."

NCP MLA Dilip Mohite's nephew arrested after his SUV runs over biker on Pune-Nashik highway

● Pune - A 19-year-old youth died in an alleged hit and run incident after the bike he was riding was hit by an SUV moving on the wrong side on the Pune Nashik Highway on Saturday night. The driver, who fled the scene after the accident and was arrested later, was identified as Mayur Mohite, the nephew of NCP MLA Dilip Mohite.

Police said that the deceased Om Sunil Bhalerao (19) was a resident of Kalamb in Ambegaon taluka of Pune district. The accident took place around 9.25 pm near Eklahare village of Ambegaon taluka on the Pune Nashik Highway. The driver of

the Fortuner SUV, Mayur Sahebrao Mohite (39), is a resident of Mohitewadi in Shel Pimpalgaon village of Khed taluka of Pune district. Mayur is the nephew of Dilip Mohite, a leader of the Ajit Pawar led NCP and is the sitting MLA in the Maharashtra assembly from the Khed Alandi assembly seat, police said.

A First Information Report (FIR) was filed by Om's uncle Nitin Bhalerao (41). "Probe suggests that the accused was driving his Fortuner SUV on the wrong side of the highway at a high speed in the direction of Kalamb to Manchar. The SUV hit the bike knocking down Om Bhalerao. He sustained multiple serious injuries and later succumbed. The driver fled the scene without helping or ensuring medical assistance to the victim. He was placed under arrest later." said Inspector Arul Fuge, Manchar police station incharge.

Opposition holds up Constitution book as PM Modi takes oath in 18th Lok Sabha

● The Opposition INDIA bloc leaders, including Congress leader Rahul Gandhi, held up copies of the Constitution as Prime Minister Narendra Modi went up to take oath as the Leader of the House on the first day of the 18th Lok Sabha session. Gandhi, speaking to reporters outside the Parliament complex, said, "The attack which the Prime Minister and Amit Shah are afflicting on the Constitution, it is not acceptable. We won't let that happen. That's why, we held up the Constitution (book) while he was taking oath. The message that no power can touch the Constitution of India is being conveyed." Before the Lok Sabha session began on Monday, Congress leaders Sonia Gandhi, and party chief Mallikarjun Kharge too held up the book of the Constitution, along with other leaders, inside the Parliament premises. Ahead of the commencement of the Parliament session, the PM, taking a jibe at the Opposition, emphasised that the people of the country wanted substance over slogans, and debate over drama.

Pitbull owner booked for causing dog-bite injury to 21-year-old

● The Chandigarh Police has booked an owner of Pitbull in an alleged case of dog bite. The victim alleged that the accused let the dog on him to attack, following an altercation.

The police have registered an FIR under Section 289 (negligent conduct with respect to animal) of the IPC at Sarangpur police station, Chandigarh, against Rajinder Singh, owner of the Pitbull, which bit the complainant, Prem Singh, 21, on June 12.

Prem claimed that he has been constructing a house at Dhanas for the past three months. Accused Rajinder Singh, who owns two Pitbull dogs, lives near his house. He had been arguing with him over the construction material kept near the house.

On June 12, Prem said, the accused again entered into an argument with him, and tried to hit him with a stick, but he managed to escape. However, then the accused let his two dogs on him.Whoever knowingly or negligently omits to take such order with any animal in his possession as is sufficient to guard against any probable danger to human life, or any probable danger of grievous hurt from such animal, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to six months, or with fine which may extend to one thousand rupees, or with both.

नीट पेपरफुटी प्रकरणी लातूरच्या दोन शिक्षकांसह चौघांवर गुन्हा, एसआयटी चौकशी होणार

● लातूर, प्रतिनिधी :

वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे हे लातूरपर्यंत पोहोचल्याचं उघड झालंय. याप्रकरणी नांदेडच्या एटीएसच्या पथकानं शनिवारी रात्री लातूरमधील दोन शिक्षकांना ताब्यात घेतलं होतं. त्यानंतर नोटीस देऊन त्या दोघांनाही सोडण्यात आलं. मात्र, रविवारी सायंकाळी संजय तुकाराम जाधव आणि जलील उमरखाँ पठाण या जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. तसंच इरन्ना मण्णाजी कोनगलवार आणि दिल्ली येथील गंगाधर अशा एकूण चौघांवर लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चौघांविरोधात लातूरच्या The Public Examinations Act 2024 चे कलम 3(v), 4 आणि 10 सह कलम 420, 120 (ब) भारतीय दंड सहिंता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलाय. विशेष बाब म्हणजे आता या संपूर्ण प्रकरणाचा तपास करण्यासाठी लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या नेतृत्वाखाली एका 'एसआयटी'ची स्थापना करण्यात आली आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेच्या (NEET) पेपरफुटीचे लातूर कनेक्शन समोर आल्यानंतर नांदेडच्या एटीएस पथकानं लातूरमध्ये शनिवारी छापेमारी केली. लातूरमध्ये दोन ठिकाणी छापे टाकून जिल्हा परिषदेच्या दोन शिक्षकांना ताब्यात घेण्यात आलं. संजय जाधव हे चाकूर तालुक्यातील बोथी येथील रहिवासी आहेत. ते सोलापूर जिल्ह्यातील टाकळी येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. तर जलील पठाण लातूरजवळील कातपूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. हे दोघंही लातूरमध्ये खासगी कोचिंग क्लासेस चालवत होते.

'जेल की बेल' अरविंद केजरीवालांचा 26 जूनला होणार 'फैसला'

सर्वोच्च न्यायालयाचा दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना धक्का

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर आज दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी पार पडणार आहे. दुसरीकडं आज सर्वोच्च न्यायालयातही अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालय आता अरविंद केजरीवाल यांच्या जामीन अर्जावर 26 जून रोजी सुनावणी घेणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयानं दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का दिल्याचं स्पष्ट झालं आहे. अरविंद केजरीवाल यांना दिल्ली दारू घोटाळ्यात मनी लाँड्रींग केल्याच्या आरोपात ईडीनं अटक केली आहे.

अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर अंतरिम स्थगिती : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर दिल्ली उच्च न्यायालयानं अंतरिम स्थगिती दिली आहे. आज सर्वोच्च न्यायालय अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर सुनावणी पार पडली. दिल्ली उच्च न्यायालयानं अरविंद केजरीवाल यांना ट्रायल कोर्टानं दिलेल्या जामीनावर सुनावणी होईपर्यंत स्थगिती दिली. शनिवारी झालेल्या या सुनावणीत निर्णय राखून ठेवण्यात आला. रविवारी अरविंद केजरीवाल

यांच्या वतीनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेत अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर अंतरिम स्थगिती देण्याबाबत आजच सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर आज दिल्ली उच्च न्यायालयात होणार आहे. दुसरीकडं आज सर्वोच्च न्यायालयातही सुनावणी पार पडली. या सुनावणीत अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का बसला आहे.

दिल्ली उच्च न्यायालयानं काय दिला निर्णय : अरविंद केजरीवाल यांना ट्रायल कोर्टानं जामीन दिल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयानं या प्रकरणी सुनावणी घेतली. यावेळी दिल्ली उच्च न्यायालयानं तपशीलवार आदेशांसाठी हे प्रकरण राखून ठेवत असल्याचं स्पष्ट केलं. याबाबत दोन ते तीन दिवसात निर्णय दिला जाईल, असं उच्च न्यायालयानं सांगितलं. उच्च न्यायालयातील एकल न्यायाधीशांनी ट्रायल कोर्टाच्या जामीन आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली जाईल, असे निर्देश दिले आहेत. दोन ते तीन दिवसांनी या प्रकरणी अंतिम आदेश निघेल, असं यावेळी स्पष्ट करण्यात आलं.

ट्रायल कोर्टानं दिली अरविंद केजरीवाल यांना जमानत : दिल्लीतील राऊज अव्हेन्यू न्यायालयानं गुरुवारी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दारू घोटाळ्यातील मनी लाँड्रिंग प्रकरणात जामीन मंजूर केला. अरविंद केजरीवाल यांना एक लाख रुपयाच्या जात मुचलक्यावर हा जामीन देण्याचा आदेश न्यायालयानं दिला होता. मात्र ईडीनं उच्च न्यायालयात धाव घेतल्यानं उच्च न्यायालयानं ट्रायल कोर्टाच्या निर्णयाला उच्च न्यायालयानं अंतरिम स्थगिती दिली. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या वकिलानं सर्वोच्च न्यायालयात धाव घेत जामिनावरील स्थगिती हटवण्याची मागणी केली. मात्र आज पार पडलेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयानंही अरविंद केजरीवाल यांच्या जामिनावर निर्णय दिला नाही.

बिहारमध्ये आणखी एका परीक्षेत हेराफेरी, 'मुन्नाभाई'सह 16 जणांना घेतलं ताब्यात

● बिहार, प्रतिनिधी :

बिहारमधील नालंदा सध्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळं सतत चर्चेत आहे. नीट पेपर लीक प्रकरणी नालंदा येथील सहा जणांना पोलिसांनी नुकतीच देवघर येथून अटक केली होती. या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू आहे. नालंदा येथे झालेल्या आणखी एका परीक्षेत हेराफेरीचं वृत्त समोर आलंय. बिहार संयुक्त प्रवेश स्पर्धा मंडळातर्फे आयोजित डिप्लोमा-कम-प्रमाणपत्र प्रवेश स्पर्धा प्रवेश परीक्षा रविवारी नालंदा जिल्ह्यातील बिहारशरीफ शहरातील 14 केंद्रांवर आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेदरम्यान प्रशासनाकडून मोठी कारवाई करण्यात आलीय. परीक्षेदरम्यान शहरातील दोन परीक्षा केंद्रांवरून एका मुन्नाभाईला आणि कॉपी करणाऱ्या 15 जणांना ताब्यात घेतलं आहेत. ही माहिती डीएसपींनी दिलीय. संपूर्ण प्रकरणाची माहिती देताना डीएसपी नूरूल हक म्हणाले की, "इस्लामपूर येथील सुभाष कुमार याला कागी मोहल्ला येथील सदर आलम मेमोरियल माध्यमिक विद्यालयाच्या परीक्षा केंद्रातून राहुल कुमारच्या जागी परीक्षा देताना पकडण्यात आलं आहे. तर कचरी आरपीएस शाळेतील 15 जणांना कॉपी करताना पकडण्यात आलंय." अखिलेश प्रसाद, नितीश कुमार, मुन्ना कुमार, रणजीत कुमार, उपेंद्र कुमार, सौरव, सोनू, चंदन, रिशु राज, आदित्य कुमार, शिव शंकर प्रसाद, पप्पू कुमार, सृष्टी कुमारी, आरती राणी, शंकर कुमार यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. सध्या पोलिसांकडून सर्वांची चौकशी सुरू आहे. बिहारशरीफ शहरातील कचरी आरपीएस स्कूल, डॅफोडिल पब्लिक स्कूल, सदर आलम मेमोरियल सेकंडरी स्कूल, बिहार टाऊन स्कूल, भैंसासूर रेसिडेंशियल मॉडेल मिडल स्कूल, शेखाना गव्हर्नमेंट गर्ल्स मिडल स्कूल, एसएस गर्ल्स स्कूल, जवाहर कन्या हायस्कूल, केंब्रिज स्कूल, पीएल. साहू स्कूल, सोगरा हायस्कूल आणि सरकारी गर्ल्स हायस्कूलमध्ये परीक्षा घेण्यात आली होती.

नाशिक शिक्षक मतदारसंघात आरोप-प्रत्यारोप

● नाशिक, प्रतिनिधी :

सत्ताधारी महायुतीतील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट समोरासमोर आल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाचा प्रचार शिगेला पोहचला आहे. एकमेकांविरुद्ध आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. महाविकास आघाडीही रिंगणात असल्याने निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. मतदारांना आपलेसे करण्यासाठी उमेदवारांकडून वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखविण्यात येत आहेत. नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघासाठी २६ जून रोजी मतदान होणार आहे.

नाशिकसह अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव या जिल्ह्यांचा समावेश असलेला हा विशाल मतदारसंघ असल्याने मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी उमेदवारांना कसरत करावी लागत आहे. मतदारसंघात २१ उमेदवार रिंगणात असले तरी मुख्य लढत शिवसेना शिंदे गटाचे विद्यामान आमदार किशोर दराडे, महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे संदीप गुळवे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे महेंद्र भावसार, शिक्षक लोकशाही आघाडीचे प्रा. भाऊसाहेब कचरे, भाजपशी संबंधित अपक्ष विवेक कोल्हे यांच्यात आहे. शिक्षक मतदारसंघ असला तरी अपवाद वगळता प्रमुख उमेदवार मात्र शिक्षक नव्हे तर, शिक्षण संस्थाचालक आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मविआकडून संजय राऊत हे प्रचाराच्या मैदानात उतरल्याने शिंदे गट आणि ठाकरे गट यांनी ही निवडणूक किती गांभीर्याने घेतली ते लक्षात येऊ शकेल.

राज्यातील सत्तेत एकत्र असतानाही शिक्षक मतदारसंघात मात्र शिंदे गट आणि अजित पवार गट एकमेकांविरुद्ध ठाकले आहेत. मतदानाला अवघे तीन दिवस बाकी असतानाही शिंदे गटाकडून अजित पवार गटाने उमेदवार मागे घ्यावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आपण शांत राहावे, यासाठी आपल्या मुलाला शिंदे गटाकडून भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्यात आला होता.

परभणीत पंकजा मुंडेंबाबत आक्षेपार्ह कमेंट

ओबीसी समाजाच्या वतीनं जिंतूर बंदची हाक

● परभणी, प्रतिनिधी :

परभणीच्या जिंतूर तालुक्यातील एका तरुणानं भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह कमेंट केल्यामुळे वाद निर्माण झाला. याच्या निषेधार्थ ओबीसी समाजाच्या वतीनं जिंतूर बंदची हाक देण्यात आली आहे. आज सकाळी आठ वाजल्यापासून जिंतूर शहरातील सर्व बाजारपेठा कडकडीत बंद ठेवण्यात आल्या आहेत. कमेंट करणारा तरुण हा अल्पवयीन असून त्याच्यावर जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे. सध्या जिंतूरमध्ये शांतता असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

लोकसभा निवडणुकांचे निकाल जाहीर

झाल्यानंतर बीडमध्ये पंकजा मुंडेंच्या आक्षेपार्ह्य पोस्टनंतर बीडमध्ये तणावाचं वातावरण पाहायला मिळालं होतं. बीड जिल्ह्यातील अनेक गावांनी याच्या निषेधार्थ बंदची हाक दिली होती. बीड, पाथर्डी, वडवणी, शिरुर यांसारख्या अनेक गावांनी बंदची हाक दिली होती. आता अशातच पुन्हा एकदा परभणीमध्ये एका तरुणानं सोशल मीडियावर एका पोस्टवर आक्षेपार्ह कमेंट केली आहे. पंकजा मुंडेंबाबत ही आक्षेपार्ह कमेंट करण्यात आली आहे. याचेच पडसाद परभणीच्या जिंतूरमध्ये उमटले आहेत. ओबीसी समाजाच्या वतीनं आज जिंतूर बंदची हाक देण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकांत बीडचा निकाल अत्यंत धक्कादायक होता. बीडमध्ये अत्यंत चुरशीच्या लढतीत भाजप नेत्या पंकजा मुंडेंना पराभवाचा सामना करावा लागला. मराठा आंदोलनामुळे हिंसेची धग बसलेल्या बीड लोकसभा मतदारसंघात शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून बजरंग सोनवणे यांनी दणदणीत विजय मिळवला.

हृदयविकाराचा झटका टाळण्यासाठी 'ऑप्टा' उपक्रम, असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडियाचा पुढाकार

● मुंबई, प्रतिनिधी :

भारतात हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होण्याचे प्रमाण अन्य देशांच्या तुलनेत २० ते २५ टक्के अधिक आहे. हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वीची प्रक्रिया असलेल्या अंजायनाला नियंत्रित केल्यास हे प्रमाण कमी होऊ शकते ही बाब लक्षात घेऊन डॉक्टरांची संघटना असलेल्या 'दी असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया'ने (एपीआय) अंजायनाला रोखण्यासाठी 'ऑप्टा' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत हृदयाशी संबंधित त्रास होत असल्याची तक्रारी असलेल्या रुग्णावर अंजायनावरील प्राथमिक उपचार करण्याचे डॉक्टरांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

छातीत दुखणे, चालायला त्रास होणे, श्वास घ्यायला त्रास होणे, शरीराच्या विविध भागात दुखणे अशा त्रासांकडे नागरिक व डॉक्टर दुर्लक्ष करतात. ही लक्षणे हृदयविकारापूर्वी असलेल्या अंजायनाची असतात. त्याकडे दुर्लक्ष केल्याने त्याची परिणीती हृदयविकाराच्या झटक्यामध्ये होते. त्यामुळे हृदयाशी संबंधित धोके कमी करण्यासाठी आणि रुग्णांना अधिक चांगले आरोग्य मिळावे यासाठी अंजायनाचे लवकरात लवकर निदान व्हावे यासाठी 'एपीआय'ने प्रथमच अंजायना सप्ताहाचे आयोजन केले आहे. त्याचबरोबर 'ऑप्टिमल ट्रीटमेंट ऑफ अंजायना (ऑप्टा) : द नीड ऑफ दि अवर' हा उपक्रम हाती घेतला आहे. यात आजाराचे वेळीच निदान होण्यासाठीचा कृती आराखडा तयार केला असल्याची माहिती एपीआयचे महासचिव डॉ. अगम व्होरा यांनी दिली. अंजायनाची समस्या लवकरात लवकर ओळखून त्यावर उपचार सुरू करणे, हृदयविकार बळावण्याची प्रक्रिया संथ करणे, हृदयविकाराचा धोका कमी करणे तसेच औषधावर होणारा अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी 'ऑप्टा' हा महत्त्वाचा उपक्रम आहे. ऑप्टा पडताळणी सूची, ऑप्टा प्रश्नावली आणि ऑप्टा दृष्टीकोन अशा तीन प्रक्रिया 'एपीआय'ने विकसित केल्या आहेत. त्याच्या योग्य अंमलबजावणीने अंजायना व पर्याययाने हृदयविकाराचा झटका रोखणे शक्य होणार असल्याचे एपीआयचे अध्यक्ष डॉ. मिलिंद नाडकर यांनी सांगितले. दुर्लक्षित असणाऱ्या अंजायनाबाबत जागरुकता निर्माण करणे आणि देशातील डॉक्टर आणि हृदयविकार तज्ज्ञांच्या माध्यमातून हा उपक्रम अधिक सक्षमपणे राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हृदयविकाराच्या आजारांशी संबंधित मृत्यूंच्या बाबतीत भारत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर आहे. दरवर्षी हृदयविकाराने मृत्यू होणाचे प्रमाण पुरुष व स्त्रियांमध्ये अनुक्रमे २०.३ टक्के आणि १६.९ टक्के इतके आहे. त्यामुळेच अंजायनाकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. भारतीयांमध्ये बरेचदा अंजायनाच्या सर्वसाधारण लक्षणांपेक्षा वेगळी लक्षणे दिसून येतात. ज्यांच्यामुळे अचूक निदान करण्यामध्ये अडथळे येऊन डॉक्टरांकडून लक्षणांपासून आराम मिळण्यासाठीची औषधे दिली जातात.

पीक कर्ज वाटपात यंदाही कूर्मगती, अकोला जिल्ह्यात केवळ ५२.५८ टक्के शेतकऱ्यांनाच...

● अकोला, प्रतिनिधी :

जिल्ह्यात यंदाही पीककर्ज वाटपाची कूर्मगती कायम आहे. खरीप हंगामाचा पहिल्या महिन्याचा शेवटचा आठवडा आला तरी अद्यापपर्यंत केवळ ५२.५८ टक्के शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्यात आले. विविध कारणांवरून अपात्र ठरवले जात असल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. त्यामुळे पेरणीसाठी पुन्हा एकदा शेतकऱ्यांना सावकाराची वाट निवडावी लागत असल्याचे धक्कादायक चित्र आहे. बँकांच्या कामगिरीवर जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी देखील तीव्र नाराजी व्यक्त करून सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत.

पीक कर्ज वाटप शेतकरी व बँकांच्या दृष्टीने कायम अडचणीचे राहिले आहे. खरीप हंगाम निघून जातो तरी पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट साध्य होत नाही. खरीप हंगामाच्या सुरुवातीला राज्यात दरवर्षी जिल्हानिहाय पीककर्ज वाटपाचे नियोजन करण्यात येते. कर्जवाटपाचे उद्दिष्ट ठरवण्यात येतात. मात्र,

प्रत्येक जिल्ह्यात उद्दिष्टाच्या ६०-७० टक्क्यांच्या आसपास कर्जवाटप होते. विविध कारण पुढे करून शेतकऱ्यांना कर्जासाठी अपात्र ठरवण्याचे प्रमाण मोठे आहे. खरीप हंगामाच्या नियोजनासह पेरणीसाठी पीक कर्जाचा आधार मिळण्याच्या आशेवर शेतकरी वर्ग बँकांमध्ये गर्दी करीत आहेत. बँकांकडून कागदपत्रांसह विविध कारणांवरून शेतकऱ्यांना पीक कर्ज नाकारण्यात येते. एकीकडे पीक कर्जासाठी शेतकरी बँकांचे उंबरठे झिजवतात, तर दुसरीकडे शेतकरी पात्र ठरत नसल्याने उद्दिष्टपूर्ती होत नसल्याचे कारण बँकांनी पुढे केले. पीक कर्ज वाटपावरून असा विरोधाभास निर्माण झाला. दरवर्षी पीक कर्ज वाटपाची उद्दिष्टपूर्ती होत नसल्याने सत्ताधारी, प्रशासन व बँका टीकेचे धनी बनतात. हे टाळण्यासाठी तीन वर्षांपूर्वी अनेक जिल्ह्यांमध्ये चक्क पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्टच कमी करण्यात आले. काही जिल्ह्यांमध्ये ३०-३५ टक्के, तर काही ठिकाणी ५० टक्क्यांपर्यंत उद्दिष्ट घटवण्यात आले होते. या निर्णयाचा फटका अनेक पात्र शेतकऱ्यांना बसला. कमी केलेल्या उद्दिष्टानुसार देखील १०० टक्के पीक कर्ज वाटप झाले नसल्याने या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह कायम आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदा १ एप्रिलपासून पीक कर्जाचे वाटप सुरू झाले. सन २०२४-२५ या वर्षात अकोला जिल्ह्यातील एक लाख ३६ हजार ७७५ शेतकऱ्यांना एक हजार ३०० कोटी रुपयांचे खरीप पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले आहे. १९ जूनपर्यंत जिल्ह्यातील ७१ हजार ९२७ शेतकऱ्यांना ७५५.३२ कोटी रुपयांचे खरीप पीककर्ज वाटप केले आहे. कर्ज वाटपासाठी शेतकऱ्यांच्या निश्चित केलेल्या संख्येच्या ५२.५८ टक्के शेतकऱ्यांना कर्ज देण्यात आले.

पायाची नस कापून महिला डॉक्टरवर डॉक्टरचा हल्ला; वाळूज परिसरातील घटना

● छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :

आर्थिक व्यवहारातून एका डॉक्टरने सहकारी महिला डॉक्टरच्या पायाची घोड नस काचेच्या तुकड्याने कापून हल्ला केला. २२ जून रोजी रात्री वाळूजमधील रुबी हॉस्पिटलमध्ये ही घटना घडली. याप्रकरणी हल्लेखोर डॉक्टरवर वाळूज पोलीस ठाण्यात रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. आतिक आजम पठाण असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी डॉ. समीना दौलतखाँ पठाण (रा. पंढरपूर ता. गंगापूर) यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार आरोपी डॉ. आतिक याला डॉ. समीना यांनी हात उसने पैसे दिले होते. वारंवार पैसे मागूनही डॉक्टर आतिक पठाण हा पैसे परत देण्यास टाळाटाळ करू लागला.

२२ जून रोजी रात्री आठ वाजता सुमारास डॉ. आतिक पठाण यांच्या रुबी हॉस्पिटलमध्ये महिला फिर्यादी पैसे मागण्यासाठी गेल्या. मात्र डॉ. आतिकने पैसे मागितल्याच्या रागात काचेच्या तुकड्याने डॉ. समीना यांच्यावर हल्ला केला. त्यांच्या पायाच्या घोड नस कापून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच शिवीगाळ करून मारहाण करीत गंभीर जखमी केले.

केवळ ११ तास आधी परीक्षा पुढे ढकलली... नीट पीजी परीक्षेच्या अनिश्चिततेमुळे विद्यार्थी त्रस्त!

● मुंबई, प्रतिनिधी :

दोन वर्षे कसून अभ्यास करून पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या नीट पीजी परीक्षेसाठी अमरावतीवरून पुण्याला दोन दिवस आधी आलो. हॉटेलचा खर्च १२ हजार रुपये झाला आणि अचानक रात्री मोबाईलवर नीट पदव्युत्तर अभ्यासक्रमाची परीक्षा पुढे ढकलल्याचा संदेश आला... हा संदेश पाहून माझ आयुष्य उद्ध्वस्त झाल्यासारखे वाटत आहे. डॉ अभय पाटील याने नीट पीजी परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर काढलेले उद्गार अस्वस्थ करणारे आहेत.

नीट परीक्षेतील घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने केवळ ११ तास अगोदर नीट पदव्युत्तर परीक्षा पुढे ढकलण्यात येत असल्याचे जाहीर केले. २३ जून रोजी ही परीक्षा होणार होती. मात्र आता ती रद्द झाल्याचे व परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल असे सरकारकडून सांगण्यात आले.

नीट पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी यंदा देशभरातून सुमारे २३ लाख विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या देशभरातील सुमारे ७०० वैद्यकीय महाविद्यालयात १,०८,९४० जागा असून गेल्यावर्षी पेक्षा यंदा दोन लाख जास्त विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या परीक्षेत ७२० गुणांपैकी

७२० गुण मिळालेल्यांची संख्या ६७ असून या परीक्षेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचे उघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर नीट पदवीसाठी पुन्हा परीक्षा घेण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल असून सुमारे २० हजार विद्यार्थ्यांनी फेरपरीक्षेची मागणी केली आहे. देशभरात विद्यार्थी व राजकीय पक्षांकडून याबाबत आंदोलन होत असतानाच आता पदव्युत्तर नीटच्या परीक्षेवरून नवा वाद नको म्हणून केंद्र सरकारने नीट पीजीची २३ जून रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे. याचा फटका हजारो विद्यार्थ्यांना बसला असून या विद्यार्थ्यांकडून आता तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश मिळावा यासाठी बहुतेक विद्यार्थी वर्ष ते दोन वर्षे तयारी करतात. ग्रामीण किंवा निमशहरी भागातील विद्यार्थी परीक्षेच्या दोनचार दिवस आधी परीक्षा केंद्राजवळील हॉटेलमध्ये पदरचे पैसे खर्च करून राहातात. अनेकदा त्यांचे पालकही त्यांच्याबरोबर येतात. आता सरकारने नीट पीजी परीक्षा पुढे ढकलल्याने या विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड बसला आहे तसेच मानसिक धक्काही बसल्याचे या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

सिंधुदुर्ग येथील आरोग्य विभागाच्या प्राथमिक केंद्रात काम करणाऱ्या डॉ राजेंद्र याने परीक्षेच्या अभ्यासासाठी वरिष्ठांच्या सहकार्याने कामाच्या वेळा बदलून घेऊन अभ्यास केला. परीक्षेसाठी तीन दिवस रजा घेऊन ७०० किलोमीटर प्रवास करून परीक्षा केंद्रावर पोहोचला आणि त्याच्या मोबाईलवर परीक्षा रद्द झाल्याचा संदेश झळकला. हा संदेश पाहून माझ्या पायाखालची जमीन सरकल्याची भावना त्याने व्यक्त केली. पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या सुमारे ४५ हजार जागा असून यासाठी जवळपास दोन लाख विद्यार्थी नीट पीजी ची परीक्षा देत आहेत. डॉ राजेश पाटील म्हणाले, परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचा संदेश जेव्हा रात्री १० वाजता पाहिला तेव्हा प्रथम मला वाटले की कुणीतरी चेष्टा करत आहे.